म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ना.वा.
दा. क्र. २८९४

BVBK-0402894

निवेदक:

शंकर अभ्यंकर

# आयव्हॅनहो

'आयव्हॅनहो' या जगप्रसिद्ध कादंबरीचा
संक्षिप्त अनुवाद

BVBK-0402894

मेहता पब्लिशिंग हाऊस

■ प्रथमावृत्ती नोव्हेंबर, १९९३

■ प्रकाशक
सुनील अनिल मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे.

■ मुद्रक
संगम प्रेस प्रा. लि,
कोथरूड,
पुणे.

■ अक्षरजुळणी
इन्द्र कॉम्प्युटर्स,
'तृप्तिदीप', ४१, एल. आय. सी. कॉलनी,
योगाचार्य कोल्हटकर पथ,
४२/२, पर्वती
पुणे.

■ मुखपृष्ठ
बाबू उडुपी

■ किंमत पंचवीस रुपये

■ © सौ. अपर्णा अभ्यंकर

गोष्टीवेल्हाळ

अभिजित, जितेन्द्र, अश्विनी,

आदित्य आणि अमित

यांना-

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | सेड्रिकच्या गढीत | ५ |
| २. | बुड्ढा आयझॅक | ११ |
| ३. | हा प्रवासी कोण ? | १७ |
| ४. | आयव्हॅनहोचा विजय | २१ |
| ५. | काळा सरदार | २९ |
| ६. | गिल्बर्टचा डाव | ३८ |
| ७. | आयव्हॅनहोची सुटका | ४५ |
| ८. | रिचर्ड दि लायन हार्ट | ५० |

## १. सेड्रिकच्या गढीत

सूर्य पश्चिमेकडं ढळला. डॉन नदीचं पात्र सूर्याच्या सोनेरी किरणात झळाळलं.

डॉन नदीच्या काठावरचं गर्द जंगल वाऱ्यावर सळसळत होतं. झाडांचे शेंडे पिवळसर दिसायला लागले.

या गर्द झाडीतून मार्ग काढत दोन घोडेस्वार मंद गतीनं पुढं निघाले होते. ते दोघं कोण असावेत, हे त्यांच्या पोषाखावरुनही स्पष्ट दिसत होतं.

त्यापैकी एक प्रख्यात नॉर्मन सरदार होता. त्याचं नाव होतं गिल्बर्ट. अंगात चिलखत चढवून तो निघाला होता. कंबरेला लांब तलवार होती. त्याचा चेहरा अतिशय क्रूर आणि खुनशी दिसत होता.

जोडीला होता तो पाद्री. वास्तविक पाद्र्याला न शोभेलसा पोषाख त्यानं केला होता. त्याच्या अंगावर सोन्याचे काही अलंकारही होते. त्याचं नाव होतं प्रायर.

आजूबाजूच्या गर्द जंगलाकडं नजर टाकत प्रायर म्हणाला,

'छे ! हा सगळा मुलुख भयंकर आहे. अशा जागी हे सॅक्सन्स राहतात तरी कसे ?'

तुच्छतेचा एक हुंकार टाकत गिल्बर्ट गुरगुरला,

'हे सॅक्सन्स म्हणजे डुकरं आहेत. ना त्यांना संस्कृती, ना सभ्यता !'

प्रायर हसला,

'तुम्हा नॉर्मन्सना सॅक्सन लोकांचा इतका तिटकारा कशासाठी ?'

'कारण उघड आहेऽऽ---'

'आणि ते मला माहीत आहे.'

'अच्छा ? मग आम्हाला तर कळू दे ते', गिल्बर्ट खवचटपणे म्हणाला.

वास्तविक इंग्लंडच्या गादीवर हक्क होता तो रिचर्डचा. हा पराक्रमी राजा लोकप्रिय होता. युध्द जिंकण्याचं त्याचं कसब अपूर्व होतं.

दुर्दैवानं असं घडलं की रिचर्ड एकदा युध्दावर गेला असतांना सैन्यबळ कमी पडलं. त्यामुळं जर्मनीमधे त्याला कैदी होऊन पडावं लागलं.

रिचर्ड पराक्रमी तर होताच, पण त्याचं औदार्यही फार मोठं होतं. त्याचं काळीज सिंहाचं होतं. म्हणूनच सॅक्सन लोकांना त्याच्याबद्दल आदर होता. ते रिचर्डला 'रिचर्ड दि लायन हार्ट' म्हणत.

रिचर्ड कैदेत पडल्याची संधी जॉननं साधली. पूर्वीपासूनच तो इंग्लंडच्या गादीवर हक्क सांगत होता.

जॉनचा स्वभाव क्रूर होता. तो पराकोटीचा स्वार्थी होता. सत्ता हातात आल्याबरोबर त्यानं त्याचा गैरवापर करण्यास सुरवात केली.

सॅक्सन लोकांबद्दल त्याला आत्यंतिक तिटकारा होता. सॅक्सनना त्यानं छळायला सुरवात केली. त्याचा परिणाम भयंकर झाला.

नॉर्मन आणि सॅक्सन टोळ्यात युध्दाची ठिणगी पडली. सगळी सत्ता नार्मन लोकांच्या हाती गेली. सॅक्सन टोळ्यांना जंगलाचा आश्रय घ्यावा लागला.

प्रायरनं ही सगळी गोष्ट सांगितल्यावर गिल्बर्ट मोठ्यानं हसला.

'तुम्हाला तर सगळीच कथा माहीत आहे. मग मला कशाला विचारता आहात ?'

'कारण उघड आहे. आपल्या प्रवासाच्या नादात आपण सॅक्सन मुलखात येऊन पोचलो आहोत.'

गिल्बर्ट चमकला. त्यानं आजूबाजूच्या जंगलाकडं नजर टाकली. रॉदरवूडचं हे जंगल सॅक्सन टोळ्यांचं होतं.

या जंगलात सॅक्सनांचा एक प्रख्यात सरदार राहात होता. त्याचं नाव होतं सेड्रिक. उंचापुरा, धिप्पाड देहाचा सेड्रिक अतिशय धाडसी व शूर होता.

सेड्रिकच्या पदरी असलेले त्याचे सैनिकही अतिशय शूर होते. त्याशिवाय वाम्बा हा त्याचा विदूषक वास्तवात अत्यंत हुशार होता आणि गर्थ हा त्याचा नोकर सेड्रिकएवढाच पराक्रमी होता. गर्थचा देह अवाढव्य होता.

गिल्बर्ट आणि प्रायर जंगलात फिरत असतांनाच गर्थ आणि वाम्बा हे दोघंही

लाकूडफाटा नेण्यासाठी तिथंच आले होते.

वाम्बानं ह्या दुकलीला पाहिलं. गर्थला कोपरानं ढोसत तो म्हणाला,

'गर्थ, ती गंमत बघ.'

गर्थनं लांबूनच गिल्बर्टला पाहिलं आणि प्रायरलाही. पोषाखाचा दिमाख करणारी ती नॉर्मन माणसं पाहून गर्थचं डोकं तापलं. तो गरजला,

'तो पाद्री बघ. कसा नवरदेवासारखा नटून चाललाय. लोकांसाठी हा काय करणार ?'

'आणि गिल्बर्ट ?'

'नुसता डुक्कर आहे तो ! महानीच. गरिबांना छळण्यापलिकडं त्यानं काहीच केलं नाही.'

'गर्थ, आपण त्यांची गंमत करू या.'

'कशी ?'

'बघ तरी ! मी विदूषक असलो, तरी डोकं सुपीक आहे माझं !'

गर्थ मनापासून हसला. म्हणाला,

'या गिल्बर्टनं गरिबांना किती लुबाडलं असेल, याला काही सीमाच नाही. गरिबांना लुटूनच श्रीमंत झालाय् तो.'

'अच्छा ? मग या जंगलात जरा भटकू दे गिल्बर्टला आणि प्रायरलाही.'

---घोड्यांच्या टापा जवळ आल्या. गिल्बर्टनं प्रायरला म्हटलं,

'बघ. दोन सॅक्सन डुकरं आहेत. त्यांना विचारू मार्ग.'

प्रायरमधला पाद्री जागा झाला. अत्यंत नाटकीपणानं त्यानं विचारलं,

'मदर चर्चचे आम्ही दोन गरीब पुत्र आहोत. आजच्या रात्रीपुरता आम्हाला चांगल्या घरात आश्रय मिळेल का ?'

वाम्बा पटकन् हसला आणि गर्थच्या कानात म्हणाला,

'हे दोघं गरीब ? अंगावरून श्रीमंती उतू चाललीय् बघ.'

गिल्बर्टला त्यांचं कुजबुजणं पाहून संशय आला. घोड्यावरून पुढं झुकून तो म्हणाला,

'काय चाललंय् तुमचं ? गुप्त कट ?'

प्रायर मधेच म्हणाला.

'या भागात सॅक्सन टोळ्यांचा पुढारी सेड्रिक राहतो. त्याचं घर माहीत आहे

का तुम्हाला ?'

गिल्बर्ट गरजला,

'मुकाट्यानं पत्ता सांगा डुकरांनो. नाहीतर हंटरनं फोडून काढीन.'

गिल्बर्टनं खरोखरच हंटर उगारलेला पाहून गर्थनं कंबरेचा सुरा उपसला.

वातावरण असं तापलेलं पाहून प्रायरला घाम फुटला. आपलं तट्टू मधे दामटून तो म्हणाला,

'थांबा. उगाच डोकी तापवू नका.'

प्रायरनं खिशातून दोन चांदीची नाणी काढली आणि वाम्बाच्या अंगावर फेकत म्हणाला,

'तू जरा शांत डोक्याचा दिसतोस. तेव्हा आम्हाला सेड्रिकच्या घराचा पत्ता सांग.'

वाम्बानं गर्थला डोळा घातला. हलक्या आवाजात तो म्हणाला,

'आता गंमत करतो यांची.'

मुद्रेवर अत्यंत गंभीर भाव आणून वाम्बानं सगळी चुकीची माहिती प्रायरला दिली. वळणावळणांचा इतका अवघड प्रवास वाम्बानं सांगितला की प्रायर आणि गिल्बर्ट यांना सेड्रिकच्या घरी पोचणं त्या जन्मी तरी शक्य नव्हतं.

वाम्बाचे आभार मानून आणि गर्थकडं एक खुनशी नजर टाकून प्रायर व गिल्बर्ट मंद चालीनं पुढच्या प्रवासाला निघाले.

'सेड्रिकच्या पराक्रमाबद्दल आम्ही खूपच ऐकलंय्' प्रायर म्हणाला.

एक डोळा बारीक करून गिल्बर्ट उत्तरला,

'अशी मुसंडी मारणारी अनेक सॅक्सन डुकरं मी पाहिली आहेत.--- पण सेड्रिकनं वाढवलेली एक मुलगी त्याच्या किल्ल्यात राहते. रॉवेना ! ती फार सुंदर आहे म्हणून ऐकलंय् मी !'

प्रायरनं फक्त मान डोलावली.

जंगलातून बराच वेळ प्रवास झाल्यावरही सेड्रिकची गढी येईना, त्यावेळी प्रायर वैतागला.

आता रात्रीची चाहूल लागली होती. प्रायरला घाम फुटला. गिल्बर्टनं तर वाम्बाला शिव्याशाप घालण्यास सुरवात केली.

त्यांच्या सुदैवानं आणखी एक प्रवासी जंगलात भेटला.

'एऽऽ कुठं निघालायस तू ?' प्रायरनं विचारलं.

सुदैवानं तो प्रवासीही सेड्रिकच्या घराकडंच निघाला होता.

'मी तुम्हाला सेड्रिकच्या घराकडं सुखरूप घेऊन जातो. काळजी करू नका',— तो प्रवासी म्हणाला.

'पण तू कोण आहेस ?', गिल्बर्टनं कपाळाला आठ्या घालून म्हटलं.

'मी प्रवासी आहे.'

'ते दिसतंय् आम्हाला. पण कुठला तू ?'

'मी पॅलेस्टाईनचा.'

'अच्छा ? मग तू इथं काय करतो आहेस ?'

'का बरं ? इथं असण्यात काय गैर आहे ?'

'वाऽ ! मला उलटी उत्तरं देतोस काय ? पॅलेस्टाईनसाठी धर्मयुध्द चालली आहेत, हे तुला माहीत नाही काय ?'

'सरदारसाहेब, ही गोष्ट सगळ्या जगाला माहीत आहे !'

'अच्छा ? मग युध्दात भाग घ्यायचा सोडून तू इथं रानावनात कशाला भटकतोयस् ?'

त्या प्रवाशानं गिल्बर्टकडं काही क्षण रोखून पाहिलं. मग खणखणीत स्वरात तो म्हणाला,

'सरदारसाहेब, मी तर बोलून चालून एक साधा शेतकरी ! तुम्ही सरदार आहात. तुमच्यासारखे लोक युध्दात भाग न घेता आपापल्या परगाण्यात चैन करत हिंडता-फिरता आणि आम्हा गरीब शेतकऱ्यांना लढायला सांगता ? वाऽऽ खासा न्याय आहे म्हणायचा !'

गिल्बर्टच्या वर्मावरच बोट ठेवलं त्या प्रवाशानं. गिल्बर्टचा नुसता संताप झाला. त्याचा हात एकदम तलवारीच्या मुठीवर गेला.

प्रायरनं ते पाहिलं मात्र, क्षणार्धात त्यानं आपलं घोडं मधे दामटलं आणि जरबेच्या स्वरात तो म्हणाला,

'हांऽहांऽ-- सरदारसाहेब- तुम्ही काय करताहात हे ? जरा सबुरीनं घ्या. या अनोळखी जंगलात फसलो आहोत आपण. या झाडीतून आपल्याला बाहेर काढणारा एकमेव वाटाड्या भेटला आहे, तर तुम्ही त्याच्यावरच तलवार चालवायला लागला होय ?'

प्रायरच्या शब्दानं गिल्बर्ट किंचितसा शरमला. प्रायर त्या वाटसरूकडं वळला आणि म्हणाला,

'आमचं जरा चुकलं बाबा. चल, जाऊ या आपण सेड्रिकच्या गढीकडं !'

तो प्रवासी मोठ्यानं हसला. शीळ घालत चालू लागला आणि चालता चालता म्हणू लागला,

**रॉदरवूडचं जंगल आहे मोठं छान**
**इथल्या झाडांचे मला माहीत आहे पान न् पान**
**ऐका ऐका सगळे, माझं हे गाणं.**
**घोड्यावरचा स्वार, सरदार का बुजगावणं ?**

गिल्बर्टला थप्पड बसल्याप्रमाणं झालं. पण करतो काय ? प्रायर आणि गिल्बर्ट मुकाट्यानं त्या प्रवाशाच्या मागं जाऊ लागले.

किर्रऽऽ अंधारात ठेचकाळत दोघंही पुढं निघाले. तो प्रवासी मात्र मजेत होता. जणू त्याच्या पायाखालचा दररोजचा रस्ता होता तो.

शेवटी एकदा कसेबसे ते सेड्रिकच्या गढीजवळ पोचले. त्या गढीची भव्यता बघून गिल्बर्ट चपापला. निदान आता तरी विश्रांती मिळणार म्हणून प्रायर मात्र खूष झाला.

पाहुणे आले आहेत, हे कळावं यासी गिल्बर्टनं कंबरेचं शिंग जोरात फुंकलं.

त्या आवाजानं नीरव शांततेचा आणि रात्रीच्या काळोखाचा पडदा फाडून टाकला.

***

क्र. २८९८. दिनांक ७/९/९८

## २. बुड्ढा आयझॅक

गिल्बर्टच्या शिंगाचा आवाज ऐकून पहाऱ्यावरचे सैनिक धावत बाहेर आले. नॉर्मन्सना पाहून त्यांच्या कपाळाला आठ्या पडल्या.

'इथंच थांबा. धनीसाहेबांना विचारून येतो. त्यांनी परवानगी दिली, तरच तुम्हाला गढीत यायला मिळेल.'

सेड्रिक नाही म्हणाला तर सगळी रात्र जंगलात काढावी लागणार, या कल्पनेनं प्रायरला घाम फुटला.

पहारेकऱ्यांनी आतल्या महालात जाऊन सेड्रिकला मुजरा घातला आणि दोन नॉर्मन आल्याची वर्दी दिली.

सेड्रिकचा चेहरा विचारमग्न झाला. तो म्हणाला,

'नॉर्मन्स ! महानीच माणसं आहेत ती सगळी. आपल्यावर फार अन्याय केला आहे त्यांनी.--- पण आपलं कुणाशीही व्यक्तिगत वैर नाही.--- आणि हे नॉर्मन्स तर आश्रय मागायला आलेत,--- घ्या त्यांना गढीत.'

आपल्याला गढीत प्रवेश मिळणार, हे कळल्यावर प्रायरनं सुटकेचा निश्वास टाकला.

वरवर कितीही आव आणला, तरी स्वतः गिल्बर्टलाही बरं वाटलं होतं. कारण त्या घनदाट जंगलात सगळी रात्र काढण्याची त्याची स्वतःची अजिबात तयारी नव्हती.

सेड्रिकची गढी प्रचंड होती. बुरूज चांगलेच बळकट होते.

सेड्रिकचे शूर सैनिक डोळ्यात तेल घालून गस्त घालत.

शत्रूवर मारा करण्याच्या अनेक जागा गढीच्या बुरूजात आणि तटबंदीत दडवलेल्या होत्या.

गढीचं प्रत्येक दालन सॅक्सन संस्कृतीची वैशिष्ट्यं दाखवणाऱ्या वस्तूंनी भरलेलं होतं. प्रत्येक भिंतीवर तलवारी, ढाली आणि भाले लटकले होते.

आतल्या कणग्या धान्यांनी भरलेल्या होत्या. दोन- चार विहिरी पाण्यांनी तुडुंब भरलेल्या होत्या.

गिल्बर्टच्या तीक्ष्ण नजरेनं यापैकी अनेक गोष्टी चटकन् टिपल्या.

प्रायर आणि गिल्बर्टबरोबर आलेल्या प्रवाशालाही अर्थातच् गढीमधे घेण्यात आलं. ओस्वाल्ड नावाच्या नोकराजवळ सेड्रिकनं त्याची चौकशी केली.

'कुठून आलाय् हा प्रवासी ?'

'पॅलेस्टाईनहून !'

'अच्छा ? मग मला विल्फ्रेडबद्दलही त्याला विचारलंच पाहिजे.'

एवढं बोलून सेड्रिक एकदम गप्प झाला. ओस्वाल्डही चमकला.

विल्फ्रेड हा सेड्रिकचा मुलगा असूनही दोघांचं अजिबात पटत नसे, हे त्याला माहीत होतं. वास्तविक विल्फ्रेड हा अतिशय गुणवान् मुलगा होता.

अत्यंत देखणा, गोरापान आणि पराक्रमीही.

पण सेड्रिकचं त्याच्याशी पटत नव्हतं आणि यासाठी ओस्वाल्डच्या मते सेड्रिकच अधिक जबाबदार होता.

विल्फ्रेडचं रॉवेनावर प्रेम होतं. रॉवेनाही विल्फ्रेडवर जिवापाड प्रेम करत असे. नेमकी हीच गोष्ट सेड्रिकला खटकत होती. दोघांनी लग्न करावं या कल्पनेलाच त्याचा विरोध होता.

आज विल्फ्रेड असता, तर सॅक्सननीच इंग्लंडवर राज्य केलं असतं, याबद्दल ओस्वाल्डला खात्री होती. पण वडलांशी पटत नसल्यामुळं विल्फ्रेडनं मायभूमीला रामराम ठोकला आणि पॅलेस्टाईनमधे चाललेल्या धुमश्चक्री धर्मयुध्दात भाग घेतला.

विल्फ्रेडला आपल्या वडलांची सारखी आठवण व्हायची. स्वतः सेड्रिकही विल्फ्रेडच्या आठवणीत गहिवरून जायचा.

पण पिता- पुत्र, दोघंही इतके स्वाभिमानी होते की हेतुपुरस्सर ते एकमेकाना भेटायचं टाळत होते.

हे सगळं मनात असल्यामुळंच सेड्रिक एकदम गप्प झाला होता. ओस्वाल्डनं हळूच म्हटलं,

'धनी, जेवायची वेळ झालीय्. शिवायं गढीत पाहुणेही आले आहेत.'

सेड्रिक उत्तरला,

'तू पानं घे. आम्ही आलोच.'

सेड्रिकच्या गढीमधे प्रायर आणि गिल्बर्ट यांना उत्तम जेवण मिळालं. जेवतांना सेड्रिकजवळ रॉवेना बसली होती.

तिचं व्यक्तिमत्त्व दुसऱ्यावर छाप पाडणारं होतं. जेवतांना गिल्बर्ट म्हणाला,

'लवकरच ॲश्बी याठिकाणी स्पर्धा होणार आहेत. तुम्ही सर्वजण येणार असालच.'

प्रायर मधेच लुडबुडला,

'तुम्ही चलाच. शिवाय अशा अडचणीच्या मुलखातून ॲश्बीपर्यंत जायचं म्हणजे अवघडच. आपल्या सुदैवानं स्वतः गिल्बर्ट- सरदारसाहेब- आपल्याबरोबर आहेत.'

सेड्रिक हसून म्हणाला,

'प्रायरसाहेब, तुमच्या गिल्बर्टपेक्षा माझं मनगट आणि तलवारीचं पातं रूंद आहे. जिवाला जीव देणाऱ्या माझ्या सैनिकांचा मला अभिमान आहे.'

प्रायरचा चेहरा पडला.

एवढ्यात एका नोकरानं आत येऊन सांगितलं,

'आणखी कुणी पाहुणा गढीत आला आहे.'

'घेऊन ये त्याला', सेड्रिकनं सांगितलं,

थोड्याच वेळात एक म्हातारा पाहुणा आत आला. त्याचं नाव होतं आयझॅक. त्या ज्यूला पाहिल्याबरोबर गिल्बर्टच्या चेहऱ्यावर आठ्या पसरल्या.

पण सेड्रिकनं आयझॅकचं स्वागत केलं आणि त्यालाही चांगलं अन्न दिलं.

पोटात अन्न गेल्यावर आयझॅकला बरं वाटलं. तेवढ्यात गिल्बर्ट म्हणाला,

'या ज्यूंबद्दल माझ्या मनात अगदी घृणा आहेत. त्यात कुणीच उच्च- नीच नाही.'

आयझॅक न रागावता म्हणाला,

'सेड्रिकबद्दल आणि सॅक्सन लोकांबद्दल मला अतिशय आदर आहे. नॉर्मन लोकांप्रमाणं ते उगाच खोटा दिमाख दाखवत नाहीत.'

प्रायरचा चेहरा पडला. पण त्याच्यामधला पाद्रीही एकदम जागा झाला. तो म्हणाला,

'बेटा, तुला काय म्हणायचं आहे ?'

'मला काय म्हणायचं आहे, ते अगदी उघड आहे. सॅक्सन लोक नॉर्मन लोकांइतकेच पराक्रमी आहेत. किंबहुना अधिक पराक्रमी आहेत.'

ते शब्द ऐकल्यावर गिल्बर्ट भडकलाच. संतापानं ओरडला,

'ते आता ॲश्बी इथं दिसलेच. तिथल्या स्पर्धात आम्ही नॉर्मन सरदार सगळ्या सॅक्सन स्पर्धकांची डोकी धडावेगळी करू.'

सेड्रिक मोठ्यानं हसला.

'सरदारसाहेब, इतकं सोपं नाही ते !'

आता आयझॅकलाही जोर चढला. तो म्हणाला,

'सिंहाचं काळीज असलेला रिचर्ड- आमचा राजा- इथं असता, तर हा प्रश्नच उद्भवला नसता. जॉननं रिचर्डला जर्मन लोकांच्या तुरूंगातून पैसे भरून सोडवायला हवं होतं. ते न करता त्यानं अन्यायानं गादी बळकावली आहे. म्हणूनच तुम्हा नॉर्मन लोकचं फावलं आहे.'

गिल्बर्टचा चेहरा पडला. सेड्रिक मोठ्यानं हसून म्हणाला,

'म्हाताऱ्या, तुला तर बरीच माहिती दिसतेय.'

'तर काय ? ॲश्बीच्या स्पर्धेचीही मला सगळी माहिती आहे.'

'खरचं ?,' रॉवेना उत्सुकतेनं म्हणाली, 'आम्हाला तरी सांगा.'

'सांगतो- सांगतो. गिल्बर्ट स्वतःला टेम्पल नाईट समजतो. पण असे खरे सहाच सरदार आहेत'.

'कोण ?'

'पहिला- अर्थातच रिचर्ड ! इंग्लंडचा खरा राजा.'

'ओऽहोऽ- त्याची तुरूंगातून लवकरच सुटका होवो, अशी मी प्रार्थना करतो', सेड्रिक म्हणाला.

'दुसरा आहे तो लिसेस्टरचा अर्ल. तिसरा सर थॉमस मल्टन. चवथा सर फॉक डॉली. पाचवा सर एडविन टर्नहॅम !'

'अरे, शेवटचे तिघं तर सॅक्सन आहेत' सेड्रिक आनंदानं ओरडला.

प्रायर आणि गिल्बर्ट यांचे चेहरे पडले.

'आणि सहावा कोण ?'

'त्याचं नाव मलाही माहीत नाही. पण पॅलेस्टाईन इथं झालेल्या युध्दात त्यानं पराक्रम गाजवला होता.'

'पण लोक काय म्हणायचे त्याला ?'

'आयव्हॅनहो !'

सेड्रिक चपापला. कारण त्याच्याच घराण्यात ते नाव होतं. त्याला वाटलं- हा विल्फ्रेड तर नसेल ? त्यानंच तर नाव बदलून असा पराक्रम गाजवला नसेल ?

एवढ्यात गिल्बर्ट तुच्छतेनं म्हणाला,

'हुंऽऽ ! असे पुष्कळ सरदार पाहिले आहेत मी. ॲश्बीच्या स्पर्धेत हा आयव्हॅनहो आलाच, तर माझ्या भाल्याच्या टोकानं त्याच्या चिंधड्या उडवीन मी.'

आयझॅक खोऽखोऽ हसला. म्हणाला,

'सरदारसाहेब, इतकं सोपं नाही ते. कदाचित् काही उलटंही घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.'

आता प्रायरही चिडीला पडला.

'तू फारच बडबडायला लागलाहेस. हे युध्द इतकं सोपं वाटलं काय तुला ? गिल्बर्टचा पराक्रम कदाचित तुला माहीत नसावा.'

'पाद्रीसाहेब, आयव्हॅनहोचा पराक्रम मी स्वतः डोळ्यांनी पाहिलाय्. असल्या दहा गिल्बर्टचा तो धुव्वा उडवेल. समजलं ?'

गिल्बर्ट चिडून म्हणाला,

'अस्सं ? लागली तर मग पैज. बघू याच कोण जिंकतो ते.'

असं म्हणून गळ्यातली सोन्याची साखळी गिल्बर्टनं समोरच्या टेबलावर फेकली.

'म्हाताऱ्या, पैजेसाठी तू काय लावणार ?'

'मी काही नॉर्मन नाही. अशा सोन्याच्या साखळ्या माझ्याकडं नाहीत. पण माझ्या गळ्यातला हा पवित्र क्रॉस मी इथं ठेवतो.'

पैज लागली. सेड्रिक म्हणाला,

'आता रात्रही बरीच झाली आहे. आता सर्वांनी झोपायला जावं हे बरं.'

म्हातारा आयझॅक त्याच्या खोलीपर्यंत जातो न जातो तोच एका नोकरानं त्याला गाठून म्हटलं,

'रॉवेना बाईसाहेब आपल्याला बोलावताहेत'.

आयझॅकला आश्चर्य वाटलं. अशा वेळी आपल्याला का बरं बोलावावं तिनं ? पण काहीही न बोलता तो रॉवेनाच्या खोलीत दाखल झाला.

'तुला आयव्हॅनहो बद्दल काय माहीत आहे, ते मला सांग' रॉवेनानं औत्सुक्यानं विचारलं.

'खरं तर मला फारशी माहिती नाही. पण पॅलेस्टाईनच्या युध्दात तो जखमी झाला होता.'

'अरे देवा !'

'काळजी करू नका बाईसाहेब ! युध्दातील जखमा बऱ्या होत आल्या असून आता आयव्हॅनहो लवकरच इंग्लंडला परत येईल, यात शंका नाही'.

'पण त्याचा प्रवास सुखरूप असेल का ?'

'अगदी सुखरूप. आपण काळजी करु नये.'

'ॲश्बीच्या स्पर्धेसाठी या पराक्रमी सरदारानं परत यावं आणि नॉर्मनांचा धुव्वा उडवावा, अशी माझी मनापासून इच्छा आहे.'

'देव तसंच करेल बाईसाहेब'.

रात्र हळुहळू संपली. सेड्रिकची गढी उन्हात उजळली.

स्वतः सेड्रिकलाही कल्पना नव्हती. पण बाहेर उजाडलेलं असूनही प्रायर आणि गिल्बर्ट यांची काळी कारस्थानं हलक्या आवाजात चालू होती.

***

## ३. हा प्रवासी कोण ?

म्हातारा आयझॅक अजूनही गाढ झोपला होता. कुणीतरी ढोसल्यामुळं त्याला जाग आली.

पिचक्या डोळ्यांनी त्यानं समोर पाहिलं. एक अनोळखी चेहरा त्याच्या दृष्टिपुढं आला.

'कोण आहेस तू ?'

'मी तुझ्यासारखाच एक प्रवासी आहे. कालच गढीत दाखल झालो'.

'अच्छा ? मग माझ्याकडं काय काम आहे ?'

'म्हातारबाबा, आता लवकर उठा आणि आपला जीव वाचवायचा असेल तर पळ काढा'.

आयझॅक ताडकन् उठून बसला. भीतीनं त्याचा चेहरा पांढराफटक पडला होता.

'मी काय केलं ?'

'तू काल नको इतका बोललास. झालेला अपमान गिल्बर्ट कधीही विसरायचा नाही'.

आयझॅक हादरलाच. त्या अनोळखी माणसाचा हात घट्ट पकडून तो कळवळून म्हणाला,

'त्संही करा- पण मला वाचवा.'

'घाबरू नकोस. मी तुझा मित्रच आहे, असं समज. मी तुला या संकटातून बाहेर काढीन.'

'तुमचे उपकार मी कसे मानू ? पण मला हे कळत नाही की माझ्यासारख्या

निरपराध म्हाताऱ्याला शत्रू तरी का असावेत ?'

'गिल्बर्टला अनेक शत्रू आहेत, हे तुला माहीत नाही काय ? तुला रेजिनाल्डच्या किल्ल्यात डांबून छळायचा त्याचा विचार आहे.'

'अरे बापरे ! पण का म्हणून ? मी काय गुन्हा केलाय् ?'

'गुन्हा काहीच नाही. पण गिल्बर्टला तुझ्याकडून पैसे हवे आहेत.'

आयझॅकनं स्वतःच्याच फाडफाड थोबाडीत मारून घेतल्या. तो म्हणाला,

'मी तर दरिद्री आहे. माझ्याकडं पैसा कुठून येणार ?'

त्या प्रवाशानं आयझॅककडं रागानं पाहिलं. तो चिडून म्हणाला,

'म्हाताऱ्या, उगाच नाटकं करू नकोस. समजलं ? आता ताबडतोब माझ्याबरोबर निघायचं बघ.'

दोघंही घाईघाईनं निघाले. त्यांनी गर्थला गाठलं. प्रवासी म्हणाला,

'गर्थ, गढीचा गुप्त दरवाजा ताबडतोब उघड.'

गर्थनं प्रवाशाकडं तिरस्कारानं पाहिलं. तो म्हणाला,

'तू काय मला तुझा नोकर समजलास ?'

प्रवासी पुढं झाला आणि त्यानं गर्थच्या कानात काहीतरी हळूच सांगितलं.

गर्थचा चेहरा आश्चर्यानं भरून गेला. तो काही बोलणार, एवढ्यात प्रवासी म्हणाला,

'बोलू नको. दार उघड.'

गर्थनं लवून मुजरा घातला आणि दार उघडलं. दोघंही बाहेर पडले आणि जंगलाच्या झाडीत मिसळून गेले.

जॉन राजाच्या निर्दयपणाच्या अनेक गोष्टी दोघंही वाटेत बोलत होते. जॉन राजाला ज्यूंचा अत्यंत तिरस्कार होता. एका ज्यूला त्यानं रेजिनाल्डच्या तुरुंगात टाकून अतिशय छळलं.

त्याचे चांगले दात जॉन राजानं मुद्दामच एकेक करून पाडले होते. शेवटी त्या ज्यूनं भली मोठी खंडणी भरल्यावरच त्याची सुटका झाली होती.

हे ऐकल्यावर तर आयझॅकला कापरंच भरलं. पण तो प्रवासी म्हणाला,

'तू काळजी करू नकोस. मी तुला शेफिल्डपर्यंत सुखरूप सोडतो'.

'कृपया तेवढं करच. शेफिल्डला माझे नातेवाईक रहातात. त्यांच्या घरी मी जाईन'.

प्रवाशानं आयझॅकला शेफिल्ड याठिकाणी सुखरूप सोडलं आणि त्याचा निरोप घेतला. पण आयझॅकनं त्याला हाक मारून म्हटलं,

'माफ करा हं. पण तुम्ही माझ्यावर खूपच उपकार केले आहेत. पण मी तर अतिशय गरीब ज्यू आहे.'

'मी तुला या अगोदरच सांगितलं आहे. मला तुझ्याकडून कोणत्याही बक्षिसाची अपेक्षा नाही.'

'नसणारच.'

'म्हणजे ?'

'माफ करा हं. पण जे उच्च कुळात जन्मलेले असतात, त्यांनाच ही कृती शक्य असते. तू कुणी सामान्य प्रवासी नाहीस, हे मी मगाच ओळखलंय्'.

प्रवासी थोडा वेळ काहीच बोलला नाही.

'मी ज्यू आहे. ज्यू कंजुष असला, तरी हुशार असतो. तुझ्या झग्याच्या आत सोनेरी कामाचा अंगरखा आहे. शिवाय सोन्याची साखळीही आहे. सरदाराशिवाय हे कोणालाही शक्य नाही. खरं सांग- तू नॉर्मन आहेस की सॅक्सन ?'

'तुझा अंदाज काय आहे ?'

'तूऽऽ तू सॅक्सन आहेस !'

प्रवाशानं प्रसन्न हास्य करून मान डोलावली.

आयझॅकनं त्याला आलिंगन दिलं.

'तुझ्यामुळं मी वाचलो. माझा अंदाज चुकीचा नसेल, तर तुला अॅश्बी इथं होणाऱ्या स्पर्धेत सहभागी व्हायचं आहे. बरोबर ?'

प्रवाशानं पुन्हा स्मित केलं.

आयझॅकनं त्याची छोटी प्रवासी पेटी उघडली. आतून कागद बाहेर काढून त्यानं घाईघाईनं एक पत्र लिहिलं.

'हे पत्र घेऊन जा. लिसेस्टरमधे एक प्रख्यात ज्यू राहतो. त्याचं नाव किरजाथ. त्याला हे पत्र दाखव. म्हणजे तुला हव्या असलेल्या सर्व गोष्टी आपोआप मिळतील'.

प्रवाशानं आयझॅकचे आभार मानले. आयझॅक म्हणाला,

'माझे कसले आभार मानतोस ? तूच तर माझा जीव वाचवलास. तुझ्यासाठी मला काही करता आलं, याचाच मला आनंद वाटतो. जा, पराक्रम गाजव. जा, ईश्वर तुझं भलं करो'.

त्या प्रवाशानं पुन्हा एकदा आयझॅकचे आभार मानले आणि तो पत्र घेऊन निघून गेला.

आयझॅक गुडघे टेकून खाली बसला. म्हणाला,

'ईश्वरा, या शूर योध्द्याला विजयी कर !'

***

## ४. आयव्हॅनहोचा विजय

स्पर्धेचा दिवस उजाडला. इंग्लंडमधील बहुतेक सर्व रस्ते आज लिसेस्टरकडं धावत होते. कारण लिसेस्टरमधील अॅश्बी इथंच स्पर्धा होणार होत्या.

या स्पर्धेसाठी स्वतः जॉन राजा हजर राहाणार होता. त्यामुळं लोकात अधिकच औत्सुक्य होतं.

दरबारातील बहुतेक सर्व मानकरी मैदानावर उपस्थित झाले होते. लोकांची प्रचंड गर्दी उसळली होती. त्यात गरीब होते, श्रीमंत होते. तरुण होते आणि वृध्दही होते.

जॉन राजासाठी खास उंच जागा तयार करण्यात आली होती. त्यावर जॉनसाठी सिंहासन ठेवण्यात आलं होतं.

इतर मानकऱ्यांसाठी मुद्दाम उंच जागा तयार करण्यात आल्या होत्या.

स्पर्धेचं मैदान प्रचंड होतं. त्यावर जागोजागी सरदारांचे तंबू उभारले होते. त्यापैकी एक तंबू सर्वांचं लक्ष वेधून घेत होता.

गडद लाल रंगाचा हा तंबू मुद्दाम गिल्बर्टसाठी उभारलेला होता.

राजाच्या वतीनं स्पर्धेत भाग घेणाऱ्या सरदारांमधे तोच प्रमुख होता.

या स्पर्धेचं स्वरूप इतर स्पर्धांहून फारच वेगळं होतं. त्या मैदानावर लांब पट्टे आखलेले होते. त्याच्या दोन्ही बाजूला जवळजवळ अर्धा मैलपर्यंत बांबू बांधून लांबलचक मार्ग तयार केला होता.

प्रत्येक स्पर्धकाला घोडदौड याच मार्गानं करायची होती. घोड्यावर बसल्यावर स्पर्धकाच्या हातात दिला जाणारा भालाही नेहमीपेक्षा वेगळा होता.

त्या भाल्याला टोक नव्हतं. त्याऐवजी भाल्याच्या पुढं जाड लोखंडी गोल गोळा होता.

स्पर्धकांनी, नेमून दिलेल्या मार्गातून विरूध्द दिशेनं एकमेकांकडं दौडत यायचं आणि हातातल्या भाल्याच्या गोळ्याचा तडाखा देऊन प्रतिस्पर्ध्याला लोळवायचं असं ठरलं होतं.

हातात निशाण घेतलेले सैनिक सज्ज होते. बिगुल फुंकणाऱ्या शिपायांची पलटण सज्ज झाली होती.

प्रेक्षक आरडाओरडा आणि दंगा करत होते.

प्रत्येक सरदाराच्या ढालीवर युध्दाचं चित्र कोरलेलं होतं.

जॉन राजाकडून स्पर्धेत उतरणार होते, त्याचे प्रख्यात सरदार गिल्बर्ट, रेजिनाल्ड आणि फिलीप. हे सर्वच सरदार अतिशय बलाढ्य आणि पराक्रमी होते.

त्या तिघांपुढं कुणाचाही टिकाव लागणार नाही, याबद्दल सर्वांचीच खात्री होती.

लोकांकडून कोण झुंजणार, याबद्दल अजून काहीच कळलेलं नव्हतं.

लोकांची उत्सुकता आता शिगेला पोचली होती. जॉन राजाच्या सिंहासनाच्या जागेसमोर आणखी एक उंच जागा खास उभारण्यात आली.

पहिल्या दिवशी स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या योध्द्यानं प्रेक्षकांमधून एका सुंदर तरूणीची निवड करायची, अशी त्या काळात पध्दत होती.

त्या स्त्रीला 'सौंदर्याची राणी ' असा किताब मिळत असे. मग त्याच सुंदरीच्या हातून शेवटी स्पर्धेतल्या विजेत्याला बक्षिस मिळत असे. त्या सुंदरीसाठीच ती खास उंच जागा उभारली होती.

हा मान आपल्याला मिळावा म्हणून लिसेस्टर परगाण्यातील तरूणी खूप नटून थटून आल्या होत्या. पण लोकांचं लक्ष त्यांच्याकडं नव्हतं.

प्रेक्षकांच्या गर्दीत काही व्यक्ती उठून दिसत होत्या. सॅक्सन टोळ्यांच्या गौरवाचा विषय सेड्रिक प्रेक्षकात बसला होता.

त्याच्या भोवती त्याचे सरकारी होते. भव्य आणि धिप्पाड देहयष्टीचा सेड्रिक प्रेक्षकात राजासारखा दिसत होता.

लोकांच्या नजरा वारंवार त्याच्याकडं जात होत्या. त्यामुळं जॉन अधिकच चिडला होता.

इतक्या गर्दीत दोन सुंदर तरूणींनी सर्वांच्या नजरा जणू खेचून घेतल्या होत्या.

त्यापैकी एक होती- रॉवेना. ती सेड्रिकच्या जवळच बसली होती. तिनं अंगात रेशमी झगा घातलेला होता. गळ्यात मोत्याच्या माळा झळाळत होत्या.

सकाळच्या कोवळ्या उन्हात तिच्या अंगावरचे सोन्याचे अलंकार चमकत होते.

प्रेक्षकांच्या गर्दीत म्हातारा आयझॅकही बसला होता. त्याच्या शेजारी त्याची तरूण मुलगी बसली होती. तिचं नाव होतं- रिबेका. ती सुध्दा रॉवेना इतकीच सुंदर होती.

जॉन राजाची नजर वारंवार रिबेकावर जात होती. स्पर्धेत आपल्या सरदारांचा विजय होणारच असं गृहीत धरून राजा खुषीत होता.

प्रायरकडं वळून तो म्हणाला,

'आपण विजयी होणार, यात शंकाच नाही. सौंदर्याची राणी म्हणून कोणाची निवड करायची, याचा विचार आपल्याला आता केलाच पाहिजे.'

'होय महाराज.'

'मला वाटतं आपण रिबेकाची निवड करावी.'

प्रायरला धक्काच बसला. तो म्हणाला,

'छे ! छे ! महाराज, हे कधी घडणारच नाही. एक ज्यू तरुणी आणि सौंदर्याची राणी ?'

ब्रॅसी नावाचा सरदार उभा राहिला आणि गरजला,

'महाराज, हा आमचा अपमान होतोय्.'

बाजू अशी अंगलट आलेली पाहून जॉन राजानं बोलणं पटकन् फिरवलं.

'तुम्हाला दुखवण्याचा माझा हेतू नाही. पण त्या सेड्रिकची जिरवायचीय् मला. त्याला वाटतंय की रॉवेनाला हा सन्मान मिळावा. सेड्रिकचं नाक कापायचंय् मला.'

'तरीही महाराज, आपला निर्णय योग्य नव्हे. एवढ्या ख्रिश्चन सुंदर तरुणी इथं उपस्थित असतांना एका ज्यू तरूणीला हा सन्मान मिळावा ? याहून आमचा दुसरा अपमान कोणता असू शकतो ?

'ठीक आहे. तुमची इच्छा नसली, तर राहिलं. मला वाटतं की स्पर्धेची वेळ आता नक्कीच झालीय्.'

जॉन राजानं हात उंचावल्यावर बिगुल उंच स्वरात वाजायला लागले.

तेवढ्यात योध्द्याचा पोषाख केलेला एक स्वार दौडत दौडत मैदानात आला. लोकांनी बेहोष आरोळ्या द्यायला सुरवात केली.

त्या स्वारानं सगळ्या मैदानाला फेरी मारली.

जॉन राजानं पुन्हा एकदा खूण केल्यावर मैदानात शांतता पसरली.

ब्रॅसी जॉनला हळूच म्हणाला,

'महाराज माझी एक सूचना आहे.--स्पर्धेत शेवटी विजयी होणाऱ्या स्पर्धकानंच सौंदर्याच्या राणीची निवड केलेली बरी.'

'मान्य आहे मला', खुषीत येऊन जॉन म्हणाला. कारण गिल्बर्ट हाच शेवटी विजयी होणार आणि आपल्या सांगण्यावरून तो रिबेकाचीच निवड करणार, याबद्दल त्याला खात्री होती.

एवढ्यात मैदानातून त्या स्वारानं उंच आवाजात स्पर्धेचे नियम सांगण्यास सुरवात केली.

'ऐका हो ऐका--इंग्लंडमधील सर्वात मानाची स्पर्धा आता सुरू होत आहे.

राजाचे पाच प्रख्यात सरदार आव्हान देणाऱ्या वीरांशी झुंजतील.

त्यांच्याबरोबर झुंज घेऊ इच्छिणाऱ्या सर्व स्पर्धकांनी लाल तंबूजवळ हजर व्हावं.

सौंदर्याची राणी निवडण्याचा मान आजच्या स्पर्धेतील विजेत्याचा आहे.

तीच सौंदर्याची राणी उद्याच्या अंतिम स्पर्धेत इंग्लंडमधील सर्वात शूर वीराची निवड करील.

उद्या होणारी युध्दं निर्णायक असतील होऽऽ'

पुन्हा बिगुल वाजायला लागले. लोकांनी अत्यानंदानं आरोळ्या दिल्या. आसमंत कल्लोळांनी भरून गेला.

राजाचे एकापेक्षा एक शूर सरदार घोड्यावरून दौडत मैदानात उतरले.

गिल्बर्ट, बेवूफ, मॅल्व्हॉसिन, रेजिनाल्ड आणि राल्फ व्हिपॉंट या पाची सरदारांनी मैदानाला फेरी मारली. त्यांचा दिमाख असा होता की शत्रूपक्षाला धडकीच भरावी.

पहिल्या फेरीतच त्यांनी पाचही प्रतिस्पर्ध्यांना जमिनीवर लोळवलं. भाल्याच्या गोळ्याचा दणका बसून चिलखतं पिचलेले वीर खाली कोसळले. त्यांना फरपटत बाहेर काढण्यात आलं.

मैदानात चमत्कारिक शांतता पसरली. जॉन राजा मात्र अक्षरशः गदगदा हसत होता.

सरदारांना आव्हान देणाऱ्या दुसऱ्या टोळीची तीच गत झाली. तिसरी, चौथी,

पाचवी— सरदारांनी सगळ्यांचा धुव्वा उडवला.

सेड्रिकच्या मुठी संतापानं वळल्या. तो वृध्द सॅक्सन नॉर्मनना आव्हान देण्यासाठी उभा राहू लागला, तोच बिगुल वाजायला लागले.

नवीन चिलखत घातलेला आणि नवा कोरा भाला हातात घेतलेला एक तरूण योध्दा मैदानात उतरला.

जॉन राजा आश्चर्यानं पाहात असतांनाच त्या तरूण योध्द्यानं खुद्द गिल्बर्टलाच आव्हान दिलं.

गिल्बर्टचा विश्वासच बसेना. जॉन राजा थक्क झाला.

संतापलेला गिल्बर्ट किंचाळला,

'मूर्ख मुला, युध्दाला येण्यापूर्वी तुझ्या आईची परवानगी घेतली आहेस का ? गिल्बर्टला युध्दाचं आव्हान देणं म्हणजे मृत्यूला आलिंगन देण्यासारखंच आहे.'

तो स्वार हसला.

पण त्या स्वाराचा चेहरा कुणालाच दिसत नव्हता. कारण युध्दाच्या प्रथेनुसार त्यानं तोंडावर मुखवटा घातला होता.

जॉन राजानं खुणेनंच त्या योध्द्याला जवळ बोलावलं आणि विचारलं,

'नाव काय तुझं ?'

योध्दा मोठ्यानं हसला,

'योध्द्याला नाव नसतं. त्याच्याजवळ फक्त पराक्रमच असतो.'

जॉन राजाच्या कपाळावर आठ्यांचं जाळं पसरलं. तिरस्कारानं तो बोलला,

'म्हणजे मृत्यूलाच निमंत्रण देतोयस् की तू !'

'ते दिसेलच !', योध्दा ओरडला.

सगळं मैदान थक्क झालं. गिल्बर्टनं पुन्हा तोंडावर मुखवटा चढवला. हातात भाला पेलला.

योध्द्यानंही दुसरं टोक गाठलं.

मैदानात शांतता पसरली. पुढच्याच क्षणी बिगुल वाजायला लागले.

गिल्बर्टनं घोड्याला टाच दिली. संतापानं तो बेभान झाला होता. त्या योध्द्यानंही घोडा भरधाव सोडला. सगळ्या मैदानानं श्वास रोखला.

भरधाव दौडत दोन्ही योध्दे एकमेकाजवळ पोचले. त्यांचे लोखंडी गोळ्यांचे भाले एकमेकांच्या ढालीवर जणकन आदळले.

प्रचंड आवाज झाला. दोन्ही स्वार घोड्यावर डळमळले. सगळ्यांना वाटलं-दोघंही खाली कोसळणार. प्रत्यक्षात मात्र तसं घडलं नाही.

दोन्ही स्वारांनी स्वतःला सावरलं आणि टोक गाठलं.

गिल्बर्टला वाटलं होतं की आपल्या पहिल्या तडाख्यातच स्वार कोसळेल. लोकांनाही तसंच वाटलं होतं. पण त्या योध्द्याला काहीच झालं नाही.

गिल्बर्ट चिडला. लोकांनी अक्षरशः जल्लोष केला.

गिल्बर्टनं घोड्याला माघारी वळवलं. पुन्हा बिगुलाचा निनाद झाला.

दोघांनीही घोड्याला टाच मारली. दोघांचेही घोडे वाऱ्याच्या वेगानं एकमेकाकडं येऊ लागले.

रॉवेनाचं ह्रदय धडधडायला लागलं. न जाणो, या तरूण स्वाराला काही झालं तर !

संतापलेल्या गिल्बर्टनं आता भाल्याचा नेम नेमका त्या तरुणाच्या ह्रदयावर धरलेला होता. एकच घाव ! बस्स ! सगळं संपणार होतं !

पण समोरचा तरूण योध्दा सावध होता. उत्तर म्हणून त्यानं घाव घालायचा ठरवला तो गिल्बर्टच्या कपाळावर.

दोघंही भरघाव दौडत एकमेकांच्या जवळ आले. गिल्बर्टनं बेभानपणे घाव घातला.

पण समोरचा स्वार सावध होता. त्यानं क्षणार्धात हुलकावणी दिली.

गिल्बर्टचा भाला हवेतूनच समोर गेला.

ती संधी त्या स्वारानं साधली आणि भाल्याच्या टोकाला असलेल्या गोळ्याचा जबरदस्त तडाखा गिल्बर्टच्या कपाळावर दिला.

गिल्बर्टच्या तोंडावर लोखंडी मुखवटा होता.

पण भाल्याच्या वेगानं तो चेपला गेला. गिल्बर्टच्या डोळ्यापुढं जणू हजारो सूर्य चमकले.

त्या तडाख्यानं तो घोड्यावरून फेकला गेला आणि धुळीत कोसळला.

काय झालं हे क्षणभर कुणालाच कळलं नाही. जॉन राजा चक्रावून पाहातच राहिला. प्रेक्षकांचे चेहरे अक्षरशः विदीर्ण झाले.

पण सेड्रिकनं टाळी वाजवली. आयझॅकनं उडीच मारली. रॉवेना आणि रिबेका उभ्या राहून आनंदानं ओरडायलाच लागल्या.

भानावर आलेल्या प्रेक्षकांनी दंगा करून मैदान डोक्यावर घेतलं.

प्रायरचा आऽ वासलेला जबडा मिटेचना.

जखमी होऊन धुळीत पडलेल्या गिल्बर्टला सैनिकांनी उचलून तंबूत नेलं.

पण गिल्बर्टला पराभूत करून त्या योध्द्याचं समाधान झालं नाही.

राजाच्या सरदारांना त्यानं एकामागून एकाला आव्हान दिलं आणि त्यांनाही धुळीत लोळवलं. प्रेक्षकातले सगळे सॅक्सन आनंदानं नाचत होते.

जॉन राजाचा चेहरा काळाठिक्कर पडला होता.

बेवूफ छातीवर घाव खाऊन बेशुध्द झाला. मॅल्व्हॉसिनच्या शिरस्त्राणावर दणका बसल्यावर तो सुध्दा घोड्योवरून फेकला गेला. चवथ्या सरदाराची दाणादाण उडाली आणि राल्फची तर अशी दाणादाण उडाली की रक्तबंबाळ अवस्थेत त्याला उचलून न्यावं लागलं.

जॉन राजाचा आता नाईलाज झाला. त्यानं घोषित केलं,

'आजच्या स्पर्धेचा मानकरी आणि विजेता म्हणजे हा अनामी शूर योध्दा !'

सौंदर्याची राणी म्हणून एका सुंदर युवतीची निवड करण्याचं काम त्या विजेत्याकडं आलं आणि क्षणार्धात त्यानं रॉवेनाची निवड केली. लोकांनी पुन्हा एकदा आनंदानं जल्लोष केला.

पहिल्या दिवसाच्या स्पर्धा संपल्या. लोक आश्चर्यानं आपापसात चर्चा करत राहिले.

'कोण असावा बरं एवढा बहाद्दर !'

'असला तर तो नॉर्मन असणं शक्यच नाही. हे पाणी सॅक्सन लोकांचंच.'

जॉन राजाजवळचं कुणीतरी बोललं,

'हा तर कदाचित रिचर्ड असला पाहिजे.'

जॉन राजा हादरलाच. एकदम किंचाळला,

'सरदारांनो, तुम्ही मला वचन दिलंय. रिचर्ड आला तर तुम्ही माझं रक्षण करणार आहात.'

ब्रॅसी म्हणाला,

'महाराज, काळजी करू नका. रिचर्ड राजा या योध्द्यापेक्षा बलशाली आहे. याच्यापेक्षा उंच आहे. रूंदही आहे. तेव्हा हा तरुण रिचर्ड असणं शक्यच नाही.'

ब्रॅसीचे शब्द ऐकून जॉनला हायसं वाटलं. पण लोक मात्र त्या योध्द्याचा

विजय झालेला पाहून बेभान झाले होते.

जॉन राजाचे सरदार पराभूत व्हावेत, हा अनुभव त्यांनी प्रथमच घेतलेला होता. त्या विजयाची धुंदी काही वेगळीच होती.

विजयी वीरानं सगळ्या मैदानाला फेरी मारला, त्यावेळी जल्लोषानं आभाळ भरून गेलं.

त्या तरुणाचं नांव होतं आयव्हॅनहो !

***

२८९४ ९/७/९४

## ५. काळा सरदार

योध्द्याच्या विजयाचा सर्वात अधिक आनंद झाला होता तो आयझॅकला. त्यानं दिलेल्या पत्रामुळंच योध्द्याला नवीन पोषाख व चिलखत मिळालेलं असणार याबद्दल त्याची खात्री होती.

विजेता योध्दा मुक्कामाच्या ठिकाणी परतला. अंगावरचं चिलखत उतरवून त्यानं किरकोळ जखमा धुतल्या. जेवण घेतलं.

त्याकाळी पध्दत अशी असे की पराभूत झालेल्या सरदारांनी आपलं चिलखत आणि घोडा विजेत्याला देऊन टाकायचा. पराभूत सरदाराचा हा सर्वात मोठा अपमान असे.

विजयी योध्द्याचं जेवण होतंय् न होतय् तोच एक नोकर आत आला. त्यानं अदबीनं म्हटलं,

'पराभूत सरदारांची चिलखतं आणि घोडे आले आहेत.'

विजेत्यानं गिल्बर्टचं चिलखत व घोडा परत केला आणि कठोर स्वरात म्हटलं,

'हे तुमच्या मालकाला परत द्या. त्याच्या घोड्यात वा चिलखतात मला रस नाही. युध्दात मी त्याचं मस्तक धडावेगळं करीन, त्याचवेळी मला बरं वाटेल.'

गिल्बर्टचे नोकर मान खाली घालून परत गेले.

इतर सरदारांच्या नोकरांकडं वळून विजेता योध्दा म्हणाला,

'तुमच्या मालकांच्या भावना मला समजतात. हे घोडे आणि चिलखतं मला नकोत.'

'आमचीही तीच इच्छा आहे. त्या मोबदल्यात आमच्यापैकी प्रत्येकजण

तुम्हाला शंभर मोहोरा द्यायला तयार आहे.'

'इतक्याही नकोत. प्रत्येकानं पन्नास मोहोरा दिल्या तरी पुरे. उरलेल्या पन्नासांपैकी पंचवीस गोरगरिबांना वाटा.'

प्रत्येकानं विजेत्याला पन्नास मोहोरा दिल्या आणि विजयाचे गोडवे गात सर्वजण परत गेले.

अजूनही कोणाला माहीत नव्हतं. पण नोकराच्या वेषात गर्थ स्वतः विजेत्याबरोबर आलेला होता. विजेत्यानं दहा मोहोरा त्याच्या हातावर ठेवल्या आणि सांगितलं,

'मला त्या म्हाताऱ्या आयझॅकनं खूपच मदत केली आहे. त्यानं दिलेल्या पैशामुळंच मला नवीन घोडा आणि चिलखत विकत घेता आलं. तेव्हा या ऐंशी मोहोरा त्या म्हाताऱ्याला नेऊन दे.'

हा योध्दा कोणी सामान्य नव्हता. हा आयव्हॅनहो म्हणजे स्वतः सेड्रीकचा मुलगाच होता.

आपल्या धाकट्या मालकाचं औदार्य बघून गर्थ अगदी खूष झाला आणि टणटण उड्या मारत आपल्या मालकानं दिलेले पैसे आयझॅकला देण्यासाठी निघाला.

याचवेळी म्हातारा आयझॅक आपल्या मुलीला म्हणत होता,

'रिबेका, मी त्या सरदाराला मदत केली खरी. पण आता तो माझे पैसे परत देतो का नाही कुणास ठाऊक.'

रिबेका चकीतच झाली. ती रागानं म्हणाली,

'बाबा, तुम्ही हे काय बोलता आहात ? त्या योध्द्यानं केवढा विजय मिळवला. त्या योध्द्यामुळचं सॅक्सन टोळ्यांची आणि ज्यू लोकांची अब्रू वाचली.'

रिबेकानं एवढं म्हटलं तरी म्हाताऱ्या आयझॅकनं पैशाबद्दल कुरकुर चालूच ठेवली. इतक्यात आयव्हॅनहोनं पाठवलेला गर्थ हजर झाला. तो म्हणाला,

'आज अपूर्व विजय मिळवलेल्या माझ्या मालकानं मला मुद्दाम पाठवलं आहे. त्यानं तुमच्या ऐंशी मोहरा परत द्यायला सांगितल्या आहेत. या घ्या.'

म्हाताऱ्या आयझॅकनं टुण्कन् उडी मारून सगळ्या मोहोरांची थैली हिसकावून घेतली. आपल्या बापाचं ते लोभी कृत्य पाहून रिबेकाची मान शरमेनं खाली गेली. गर्थ परत निघाल्यावर तिनं त्याला दरवाजाजवळ गाठलं आणि ती म्हणाली,

'माझ्या वडिलांनी तुझी थट्टा केली. त्यांना पैसे नको आहेत. पैसे दिले होतेस तू ?'

'ऐंशी मोहोरा.' गर्थ म्हणाला.

रिबेकानं मोहोरांची थैली गर्थला परत केली.

गर्थनं मोहरा घेतल्या. तो स्वतःशीच हसला. पण त्यानं ओळखलं, रिबेका आयव्हॅनहोच्या प्रेमात पडली आहे.

त्यानं मोजून पाहिलं. शंभर मोहोरा होत्या त्या.

'वीस मोहोरा तुला दिल्या आहेत मी.' रिबेका म्हणाली.

गर्थचा स्वतःच्या कानावर विश्वासच बसेना. एका दिवसात त्याची तीस सोनेरी मोहोरांची कमाई झालेली होती. त्याच्यासारख्या भाग्यवान तोच.

आनंदानं शीळ घालत तो आपल्या मालकाकडं परत निघाला आणि ध्यानीमनी नसताना एका अंधाऱ्या बोळात पाच-सहा बुरखेवाल्यांनी त्याच्यावर हल्ला केला. त्याला जमीनीवर दाबून धरून त्यांनी त्याचे पैसे काढून घेतले.

'किती पैसे आहेत ?' त्यांच्या म्होरक्यानं विचारलं.

'तीस.' गर्थ गुरगुरला.

'पण यात तर जास्त पैसे दिसतात ?'

'होय. पण ते सगळे पैसे माझे नाहीत.'

'मग कुणाचे आहेत हे ?'

'माझ्या मालकाचे.'

'कोण आहे तुझा मालक ?'

'आजच्या स्पर्धेचा विजेता.'

'अच्छा ! मग हे पैसे तुझ्या मालकाला परत द्यायला पाहिजेत. कारण त्या योध्द्याबद्दल आम्हालाही अभिमान वाटतो.'

'हं !' तिरस्कारानं गर्थ म्हणाला,' हिंमत असेल तर माझ्या एक ट्याबरोबर लढा. पैसे परत करण्याचं सोंग कशाला आणताय ?'

'म्हणजे तुला लढताही येतं तर ?'

'मग तुम्हाला काय वाटलं ? ही काठी काय गम्मत म्हणून जवळ ठेवली आहे मी ?'

'अच्छा ! मिलर, हो रे पुढं. झांज उतरव त्याची.'

त्या टोळीतला एक धिप्पाड मनुष्य पुढे झाला आणि दोघंही एकमेकावर तुटून पडले.

हवेत काठ्यांचे आवाज घुमायला लागले. दोघंही शरीरानं धिप्पाड असले तरी चपळही होते. मिलरला वाटत होतं की बघता बघता आपण प्रतिस्पर्ध्याला लोळवू.

प्रत्यक्षात उलटच घडायला लागलं. दमलेला मिलर धापा टाकायला लागला.

ती संधी साधून गर्थनं लाठीचा एक जबरदस्त तडाखा मिलरला मारला. त्या फटक्यामागं अशी ताकद होती की दोनचार कोलांट्या खाऊन मिलर निपचित पडला.

त्या टोळीच्या म्होरक्यानं गर्थची पाठ थोपटली. तो म्हणाला,

'शाब्बास रे वाघा ! अशी शूर माणसं मला आवडतात. जा! तू आता. मिलरची आम्ही काळजी घेऊ.'

'पण तू कोण आहेस ?' गर्थनं आश्चर्यानं विचारलं.

टोळीतला एकजण पुढं आला आणि म्हणाला,

'म्हणजे ? तू लॉकस्लेला ओळखलं नाहीस काय ?'

गर्थ चकीत झाला. पटकन मुजरा घालून तो म्हणाला,

'रॉबिनहूड इतक्याच पराक्रमी आणि तितकीच कीर्ती मिळवलेल्या लॉकस्लेला माझा मुजरा.'

इतकं बोलून तो झपाट्यानं आयव्हॅनहोकडं आला आणि घडलेली सर्व हकीकत त्याला सांगितली.

त्या रात्री त्यानंतर काही विशेष घडलं नाही !

दुसरा दिवस उजाडला. बिगुल वाजायला लागले. युध्द्याच्या स्पर्धेचा हा दुसरा आणि शेवटचा दिवस होता.

मैदानात कालच्यापेक्षाही आज अधिक गर्दी होती. राजाचे सरदार उपस्थित होते. स्वतः जॉन राजा संतापलेल्या मुद्रेनं सिंहासनावर बसलेला होता.

त्याच्या दृष्टीनं दिलासा मिळालेली एकच गोष्ट होती आणि ती म्हणजे गिल्बर्टला फारशी जखम झालेली नव्हती. फक्त मुका मार लागलेला होता.

रात्रीच्या अंधारात बसून जॉन राजा आणि गिल्बर्ट यांनी एक भयानक डाव आखलेला होता.

आपल्याच राज्यात एका तिऱ्हाईताचा झालेला विजय जॉन राजाला अतिशय

झोंबलेला होता. म्हणूनच त्या विजेत्याला संपवण्याचं कारस्थान राजानं आखलेलं होतं.

आयव्हॅनहोला याचा पत्ताच नव्हता. त्याला विजयाची खात्री होती.

आज जॉन राजाच्या सिंहासनाजवळ रॉवेनाची खुर्ची मांडली होती.

सूडाच्या भावनेनं पेटलेला गिल्बर्ट आज अधिक बळकट चिलखत अंगावर घालून आला होता. आजच्या युध्दात कुणाच्याही जीवावर बेतण्याचीही शक्यता होती.

अशा प्रसंगी हातातील काठी मैदानात फेकून त्या योध्द्याला वाचवण्याचा अधिकार खुद्द जॉन राजाला देण्यात आला होता.

पुन्हा बिगुल वाजले आणि स्पर्धेला सुरवात झाली. सरदारांनी तोंडावर मुखवटे ओढले. भाल्याची टोकं जरा खाली झाली.

शेकडो स्पर्धक दौडत सुटले. मैदानाला त्यांनी फेरी मारली. धुळीचे लोट आकाशात उसळले. समोरचं काही दिसेनासं झालं.

आजच्या स्पर्धेचं आणखी एक वैशिष्ट्य होतं. ते म्हणजे आयव्हॅनहोच्या मदतीसाठी आणखी एक उंचापुरा, सशक्त योध्दा मैदानात उतरला होता. प्रेक्षकांना प्रथम वाटलं की तो बहुधा सेड्रिकच असावा. पण स्वतः सेड्रिक तर प्रेक्षकातच बसला होता.

मग हा योध्दा कोण असावा बरं ?

स्पर्धेचं चित्र हळुहळू स्पष्ट होऊ लागलं. एका बाजूनं गिल्बर्ट विजयी होत येत होता, तर दुसऱ्या गटातून आयव्हॅनहो !

होता होता सगळ्यांची दाणादाण उडाली.

मैदानात आता फक्त तीनच योध्दे उरले होते. गिल्बर्ट, आयव्हॅनहो आणि तो नवीन योध्दा !

त्या नवीन योध्द्याचा सगळा पोषाख काळा होता. म्हणून प्रेक्षक त्याला म्हणायला लागले होते-काळा सरदार.

तो काळा सरदार आयव्हॅनहोला म्हणाला,

'गिल्बर्ट तुझी शिकार आहे. तेव्हा तूच त्याच्याशी झुंज !'

आता मैदानात शांतता पसरली होती.

गिल्बर्ट आणि आयव्हॅनहो यांच्यातील निर्णायक युध्द पाहण्यासाठी प्रेक्षकांचे

प्राण डोळ्यात उतरले होते.

लांब पात्याच्या धारदार तलवारी दोघांच्याही म्यानातून सर्रकन् बाहेर पडल्या. घावावर घाव पडायला लागले. ठिणग्या उडाल्या.

पराक्रमाची शर्थ करणारं ते युध्द बघून अवघी माणसं थरारून गेली.

दोघांपैकी कुणीही रेसभर मागं सरकायला तयार नव्हतं. दात ओठ खात दोघंही ताकदीनं सपासप घाव घालत होते.

गिरक्या घेत, उलटं वळून दोघांनी कहर चालवला होता.

अर्धा तास झाला आणि गिल्बर्टची चपळाई कमी होऊ लागली. तो ढिला पडू लागला.

लोकांनी आनंदानं जल्लोष केला.

राजाच्या आदेशाबरोबर बेवूफ आणि अॅथेलस्टन हे दोन सरदार उड्या मारून मैदानात उतरले.

त्यांच्या लखलखत्या तलवारी म्यानातून बाहेर पडल्या. दुसऱ्याच क्षणी ते आयव्हॅनहोवर तुटून पडले.

आपल्यावर असं संकट कोसळलेलं पाहूनही आयव्हॅनहो डगमगला नाही. चपळाईनं घाव चुकवून रिंगण घेत तिघांवरही तो आलटून-पालटून घाव घालू लागला.

ताज्या दमाचे दोन सरदार आपल्या मदतीला आलेले पाहून गिल्बर्टला एकदम हत्तीचं बळ आलं. घनघोर धुमश्चक्री सुरू झाली.

तिघांच्या ताकदीपुढं आयव्हॅनहो कमी पडतोय्, असं स्पष्ट दिसायला लागलं. आता ?

युध्दाला अशी कलाटणी मिळालेली बघून प्रेक्षक थक्क झाले. संतापलेल्या सेड्रिकनं तलवारीला हात घातला.

एवढ्यात काळा सरदार उठला. विजेच्या वेगानं हालचाली करून तो मैदानात उतरला.

दंगा करून प्रेक्षकांनी मैदान डोक्यावर घेतलं. काळा सरदार मैदानात उतरल्याबरोबर बेवूफनं त्याच्यावर चाल केली.

काळ्या सरदाराची ताकद त्याला माहीत नसावी. बेवूफनं घातलेला घाव काळ्या सरदारानं ढालीवर झेलला.

त्याची पुढची हालचाल विजेसारखी होती. म्हणजे विजेचं चापल्य आणि दाहकता त्यात होती. हातातला परशू उचलून त्यानं असा काही जबर तडाखा बेवूफच्या डोक्यावर मारला की त्याचं शिरस्त्राण तुटलं. रक्ताचे ओघळ बेवूफच्या तोंडावर उतरले.

गुडघे मोडल्याप्रमाणं तो धुळीत पडला. चिडलेल्या अ‍ॅथेल्स्टननं काळ्या सरदारावर चाल केली.

पण सरदारानं अ‍ॅथेल्स्टनला तलवार उचलायलाही संधी दिली नाही. पहिल्या तडाख्यात त्यानं त्याची ढाल उडवली आणि दुसऱ्या फटक्यात त्यानं अ‍ॅथेल्स्टनला लोळवलं.

मग काळा सरदार ओरडला,

'आता घे समाचार गिल्बर्टचा.'

आयव्हॅनहो आता असा उसळला की ज्याचं नाव ते ! गिल्बर्टवर तो तुटून पडला. अन्यायी नॉर्मन्सवरचा त्याचा सगळा राग जणू उफाळून आला.

गिल्बर्टसारख्या प्रख्यात सरदाराचा विश्वासही त्यामुळं पार ढासळला. अंग चोरून तो मागं सरकू लागला. जॉन राजा पांढरा पडला.

आयव्हॅनहोनं गिल्बर्टची ढाल चेपवली. तलवार उडवून दिली. आणखी एका तडाख्यात त्यानं गिल्बर्टला लोळवलं.

आता एकच घाव- गिल्बर्टचं मस्तक धडावेगळं होणार होतं.

एवढ्यात जॉन राजा किंचाळला,

'थांब !'

आणि क्षणाचाही वेळ न गमावता त्यानं हातातली काठी मैदानात फेकली.

त्याचा अर्थ स्पष्ट होता. गिल्बर्टचा जीव वाचवणं. नाईलाजानं आयव्हॅनहोला उगारलेली तलवार म्यान करावी लागली.

बेहोष झालेले प्रेक्षक मैदानात घुसले. शरमलेला गिल्बर्ट सैनिकांच्या आधारानं कसाबसा मैदानाबाहेर गेला.

अत्यानंदानं प्रेक्षक नाचत होते. आयव्हॅनहोला खांद्यावर घेऊन धावत होते.

पडलेल्या चेहऱ्यानं पुढं होऊन प्रायर म्हणाला,

'महाराज, आजच्या विजेत्याचं नाव तुम्हाला घोषित करावयाचं आहे.'

चिडलेल्या जॉन राजाच्या मनात अगदी खुनशी विचार डोकवायला लागले

होते. विजेत्याच्या नावाची घोषणा राजानं करावी म्हणून लोकही उत्सुक झाले होते.

दोन्ही हात उंचावून राजानं लोकांना शांत केलं आणि उंच स्वरात तो म्हणाला,

'आजच्या स्पर्धेचा विजेता म्हणून मी काळ्या सरदाराचं नाव घोषित करतो आहे.'

प्रेक्षक तर थक्कच झाले. रॉवेना आश्चर्यानं राजाकडं पाहायला लागली. इतकचं काय पण राजाचे सरदार सुध्दा गोंधळून गेले.

आयव्हॅनहोनं एवढा प्रचंड पराक्रम गाजवला होता की त्याच्या नावाशिवाय आणखी कुणाचं विजेता म्हणून नाव येणं अशक्यच होतं.

ब्रॅसी नावाचा सरदार पुढं गेला आणि घाईघाईनं म्हणाला,

'महाराज, मला वाटतं की हा निर्णय फारच चुकीचा होतोय्.---तुम्ही निर्णय फिरवला पाहिजे.'

खुद्द प्रायर बोलला,

'छे ! छे ! असं होता कामा नये. लोकं अशानं संतापतील.'

गंमत अशी झाली होती की तो काळा सरदार जणू अदृश्य झाला होता. त्याचा पत्ता कुठंच नव्हता.

आता जॉन राजाचा नाईलाजच झाला.

आयव्हॅनहोलाच विजेता म्हणून त्याला निवडावं लागलं. अर्थात हा पराक्रमी योध्दा म्हणजे आयव्हॅनहो आहे, याची तोपर्यंत कुणालाच कल्पना नव्हती.

लोक त्याचा जयजयकार करत असतांनाच आयव्हॅनहो पायऱ्या चढून राजाच्या सिंहासनाजवळ गेला.

जॉन राजानं खोटं हसून त्याचं स्वागत केलं. तो रॉवेनाकडं बघून म्हणाला,

'रॉवेना, या सरदाराला विजेता म्हणून घोषित करायचा आणि त्याच्या डोक्यावर हा सोन्याचा मुकुट चढवण्याचा मान तुझा आहे !'

हातात सोन्याच्या मुकुट घेऊन रॉवेना पुढं झाली. आयव्हॅनहोच्या समोर येऊन ती म्हणाली,

'शूर वीरा, तुझं स्वागत आहे. इंग्लंडमधील सर्वात शूर योध्दा आहेस तू !-- पण तुझ्या मस्तकावर विजयाचा हा मुकुट ठेवण्यापूर्वी आमची एकच इच्छा आहे.-- तुझा चेहरा आम्हा सर्वांना पाहायला मिळावा.'

काहीही न बोलता आयव्हॅनहोनं शिरस्त्राण बाजूला केलं. शूर योध्द्याला

पाहण्यासाठी लोकांची तुफान गर्दी उसळली. सेड्रिकही पुढं घुसला.

योध्द्यानं शिरस्त्राण बाजूला केलं. रॉवेनानं पाहिलं मात्र. आश्चर्यानं ती थक्कच झाली. कारण तिचा आवडता आयव्हॅनहोच पुढं उभा होता.

अत्यानंदानं पुढं होऊन तिनं सोन्याचा मुकुट त्याच्या मस्तकावर चढवला.

आयव्हॅनहोनं स्मित केलं.

पण पुढच्याच क्षणी ते स्मित लोपलं. अगदी दगडात कोरल्याप्रमाणं त्याचा चेहरा झाला आणि गुडघे टेकून तो खाली कोसळला.

इंग्लंडचा सर्वात शूर योध्दा म्हणजे आपलाच मुलगा आहे, हे पाहून सेड्रिक आनंदानं गहिवरला, अगदी चकीतच झाला. विल्फ्रेडलाच सर्वजण आयव्हॅनहो म्हणत असत.

पण आयव्हॅनहो असा कोसळलेला पाहून तोही गोंधळला.

सिंहासनाजवळ आता गर्दी झाली होती. दोन सैनिकांनी पुढं होऊन आयव्हॅनहोच्या अंगावरचं चिलखत बाजूला केलं.

त्या युध्दाच्या धुमश्चकीत त्याच्या छातीत खोलवर जखम झाली होती. त्यातून रक्तही बरंच वाहून गेलं होतं. त्यामुळंच भोवळ येऊन तो बेशुध्द झाला होता.

गर्दीमुळं सेड्रिकला पुढचं नीट दिसेना. तो ओस्वाल्डला म्हणाला,

'ओस्वाल्ड, तू पुढं जा आणि विल्फ्रेडची काळजी घे.'

पण ओस्वाल्ड पुढं जाण्यापूर्वीच विल्फ्रेड जणू गर्दीत हरवला होता. ओस्वाल्ड गर्दी चिरून पुढं गेला. पण आयव्हॅनहोचा कुठंच पत्ता नव्हता.

ओस्वाल्डचे पाय जडावले. त्याला वाटलं- आयव्हॅनहोशी कुणी दगाफटका तर केला नसेल ?

***

बाल वाङ्मय विभाग
2668 दिनांक 1/11/68

## ६. गिल्बर्टचा डाव

सेड्रिक आणि रॉवेना यांची अतिशय निराशा झाली. कारण आयव्हॅनहोला कुणीतरी अक्षरशः पळवून नेलं होतं.

सेड्रिकला हेही समजत होतं की आता फार वेळ तिथं थांबण्यात अर्थ नव्हता. कारण जॉन राजा चिडलेला होता. कदाचित त्यानं सेड्रिकला अटकही केली असती.

म्हणूनच सेड्रिकनं ओस्वाल्डला खूण केली. रॉवेनाचा हात धरून तिला गर्दीतून बाहेर काढली. एवढ्यात वाम्बा आणि गर्थही त्यांना येऊन मिळाले. सर्वजण झपाट्यानं रॉदरवूडच्या जंगलाकडं निघाले.

गर्थ म्हणाला,

'धनी, काळजी करू नका. धाकटे मालक सुखरूप आहेत. त्यांना जखमी अवस्थेत कुणीतरी हलवलं आहे.'

इतका वेळ काळजी करणारा सेड्रिक रागावून म्हणाला,

'अच्छा ? कुणीतरी नॉर्मन असेल. त्याला स्वतःच्या वडलांची शस्त्रं घेऊन लढायला शरम वाटली की काय कुणास ठाऊक ! नॉर्मन लोकांची शस्त्रं घेऊन लढला वेडा !'

'शस्त्रं कुणाची का असेनात. विल्फ्रेड कसा लढला ते सगळ्या लिसेस्टरनं पाहिलंय् आणि मला त्याचा अत्यंत अभिमान वाटतो.'

'चूप बैस ! तो एक मूर्ख आणि तू सात मूर्ख !'

'किती रागावता तुम्ही ! तुमच्या अशा वागण्यानंच तुम्हा दोघात अंतर पडलं--'

रॉवेनाचा मुद्दा बिनतोड होता. सेड्रिक गप्प बसला. त्यांचा प्रवास पुढं चालू

असतांना वाटेत त्यांना आयझॅक आणि रिबेका येऊन मिळाले.

बेवूफ आणि रेजिनाल्ड यांनी रिबेकाला पळवण्याचा प्रयत्न केला होता. पण आयझॅक कसाबसा पळाला होता.

रिबेका अतिशय घाबरली होती. रॉवेनानं तिला धीर दिला आणि त्यांचा पुढचा प्रवास सुरू झाला.

पण पुढं कोणतं संकट वाढून ठेवलंय् याची त्यांना कल्पना नव्हती.

प्रत्यक्ष रॉदरवूड जंगल येण्यापूर्वी अनेक जंगलातून त्यांना प्रवास करावा लागणार होता. अशाच एका जंगलातील अरुंद वाटेवरून त्यांचा प्रवास चालू होता.

सेड्रिक सावध झाला. आपल्या नोकरांना त्यानं सांगितलं,

'शस्त्र घेऊन सावध रहा.'

पण सेड्रिकचे शब्द पूर्ण होण्यापूर्वीच, जंगलात लपलेल्या जॉन राजाच्या सैनिकांनी एकदम त्यांच्यावर हल्ला चढवला.

सेड्रिक आणि त्याचे नोकर मूठभर होते. पण जॉन राजाच्या सैनिकांची संख्या मोठी होती.

सेड्रिक वृध्द झाला होता, पण एखाद्या तरुणाच्या तडफेनं तो लढला. त्याच्यासमोर येणाऱ्या प्रत्येक सैनिकाला त्यानं कंठस्नान घातलं.

गर्थला तर ही पर्वणीच होती. दोन हातात दोन तलवारी घेऊन तो जॉन राजाच्या सैनिकांना छाटत सुटला.

वाम्बानं तर गंमतच मांडली होती. तो कोलांट्या घेत होता. कुणाच्या पायातून पलिकडं जात होता.

मूठभर शत्रू आवरत नसलेला पाहून सेड्रिकवर कुणीतरी मागून हल्ला चढवला आणि त्याच्या मस्तकावर घाव घातला. जखमी सेड्रिक खाली कोसळला.

जॉन राजाच्या सैनिकांनी सर्वांना कैद केलं. पण त्या धुमश्चक्रीत वाम्बा आणि गर्थ मात्र निसटले.

आपला मालक जखमी अवस्थेत पकडला गेलेला पाहून वाम्बा लहान मुलासारखा रडायला लागला. पण गर्थनं त्याला धीर दिला.

'वाम्बा घाबरू नकोस. आपले धनी कैदी झाले, तरी आपण स्वतंत्र आहोत. धन्याला कसं सोडवता येईल, याचाच विचार आपल्याला केला पाहिजे.'

वाम्बाला ते पटलं. दोघंही जंगलाचा आश्रय घेण्यासाठी गर्द झाडीत घुसले.

पुढं-पुढं जात असतांनाच अचानक गर्थच्या कानावर शब्द आले,

'काय गर्थ, आज आमच्या जंगलात ?'

गर्थ दचकलाच. पण त्याच्या लक्षात आलं- तो आवाज लॉकस्लेचा होता.

गर्थला आनंद झाला. त्यानं उडीच मारली. झाडीतून लॉक्सले आणि त्याचे साथीदार बाहेर आले. गर्थनं लॉकस्लेला मिठीच मारली.

मिलर पुढं येऊन म्हणाला,

'गर्थ, बहाद्दर आहेस. नुसताच धिप्पाड नाहीस.'

गर्थनं झालेली सगळी हकीकत लॉकस्लेला सांगितली. लॉकस्लेनं क्षणभर विचार केला. त्यानं विचारलं,

'रॉवेना, रिबेका यांनाही पकडलं ? आणि आयझॅक ?'

'आम्ही दोघंच सुटलो. बाकी सगळ्यांना पकडलं.'

'घाबरू नकोस, या भागातील प्रत्येक गढी मला माहीत आहे. दोनचार किल्ले आहेत. पण त्यांचीही मला माहिती आहे.'

लॉकस्ले असं बोलत असतानाच घोड्याच्या टापांचा आवाज आला. सर्वांच्या तलवारी म्यानातून बाहेर पडल्या.

एवढ्यात काळा सरदार दौडत दौडत तिथं आला.

लॉकस्लेनं त्याचं स्वागत केलं.

'या जंगलानं शूरांचा नेहमीच सन्मान केला आहे. काळ्या सरदाराचा पराक्रम अजब आहे. आम्ही त्याचं मनापासून स्वागत करतो.'

काळा सरदार हसला. काही क्षणातच त्याचे काही शूर अनुयायी त्याच्यामागं येऊन उभे राहिले.

लॉकस्ले म्हणाला,

'आमचा एक मित्र आज संकटात आहे. आम्हाला मदत करशील ?'

'कोण संकटात आहे ?'

'सेड्रिक !'

'मग तर तुम्हाला मदत केलीच पाहिजे.'

लॉकस्ले आणि गर्थ खूषच झाले.

रॉबिनहूडप्रमाणंच लॉकस्लेनं त्याची चांगली टोळी जमवलेली होती.

नावंही तशीच होती. ॲलन-अ-डेल, छोटा जॉन, फ्रायर टक !

लॉकस्लेनं सांगितलं,

'चला- सज्ज व्हा शस्त्र घेऊन. सेड्रिकला सोडवण्यासाठी आपल्याला प्रयत्नांची शर्थ केली पाहिजे.'

लॉकस्लेनं कंबरेनं शिंग जोरात फुंकलं. त्यानं जंगलाचा कानाकोपरा निनादून गेला. वीररसानं रसरसलेले सगळे वीर दौडत निघाले---

---सेड्रिकला पकडल्यावर गिल्बर्ट आणि ब्रॅसी बेहद्द खूष झाले होते.

गदगदा हसत गिल्बर्ट म्हणाला,

'आता रिबेकाबरोबर मी लग्न करतो. पाहतोच आता माझ्या तावडीतून कशी निसटते ती.'

'आणि मी रॉवेनाबरोबर लग्न करणार', ब्रॅसी बरळला, 'पण या उरलेल्या डुकरांचं काय करायचं ?'

'ही सॅक्सन डुकरं ?- त्या सगळ्यांना खलास करून टाकू या. समजलं ?'

नॉर्मनांच्या ताब्यात असलेल्या एका बलाढ्य किल्ल्याजवळ सगळे पोचले.

रॉवेना आणि रिबेका यांना वेगवेगळ्या पण चांगल्या खोल्यात बंद करण्यात आलं.

सेड्रिकला तुरुंगात टाकण्यात आलं. बिचाऱ्या आयझॅकची दशा झाली तळघरातील एका कोठडीत त्याला फेकण्यात आलं.

आत भयानक थंडी होती.

सगळीकडं ओलसरपणा होता. थंड वाऱ्याच्या झुळका अंगावर येत होत्या. आयझॅक काकडून गेला.

ती खोली म्हणजे कैद्याचा छळ करण्याची कोठडी होती.

आयझॅकचा थरकाप झाला. तो प्रार्थना करू लागला, त्याचवेळी बेवूफ गदगदा हसत आत आला. बरोबरच्या सैनिकांना तो म्हणाला,

'या आयझॅक नामक कुत्र्याचं काय करायचं ?'

आयझॅकनं गुडघे टेकले. तो म्हणाला,

'दया करा. माझ्यावर दया करा. माझ्या कोवळ्या मुलीला आणि मला सोडून द्या.'

'अवश्य सोडू. पण आम्ही सांगतो, तेवढी रक्कम तुला खंडणी म्हणून भरावी लागेल.'

'पण मी गरीब आहे.'

'हाऽ ! हाऽ ! हाऽ ! तू आणि गरीब ? समोरच्या विस्तवात लाल झालेल्या या लोखंडी सळ्या पाहिल्यास का तू ?'

'मला मारू नका. पण माझ्याजवळ पैसे नाहीत हो. खरंच नाहीत.'

'हे बघ म्हाताऱ्या डुकरा, तुझ्याबरोबर हुज्जत घालायला मला वेळ नाही. पैसे देणार आहेस की नाही, तेवढं सांग.'

'पण माझा अपराध काय आहे, ते तरी कळू दे !'

'अपराध ? तीन अपराध आहेत तुझे. एक तर तू ज्यू आहेस. दुसरी गोष्ट म्हणजे आम्हा नॉर्मन उमरावांना मदत करण्याऐवजी तू सॅक्सन डुकरांना मदत करतोस.'

आयझॅक भीतीनं लटलट कापायला लागला.

'म्हाताऱ्या, तो समोरचा लोखंडी पलंग पाहिलास ? तापून तापून त्यातून वाफा निघायला लागल्या आहेत. आम्ही आता तुला त्यावर बांधणार आहोत.'

'नकोऽ नकोऽ- मी तुम्हाला पैसे देतो. पण माझा तिसरा अपराध तर सांगा.'

'हाऽ ! हाऽ ! तुझ्यासारख्या घाणेरड्या ज्यूला इतकी सुंदर मुलगी असावी, हाच तुझा तिसरा अपराध आहे.'

'पण माझी लाडकी रिबेका आहे तरी कुठं ?'

'कुठं ? हाऽ ! हाऽ ! ती आता गिल्बर्टच्या ताब्यात आहे आणि लवकरच तिला गिल्बर्टशी लग्न करावं लागेल.'

इतका वेळ आयझॅक भीतीनं शहारला होता. रिबेकावर असं संकट कोसळलेलं ऐकून म्हातारा आयझॅक नागासारखा उफाळला आणि किंचाळला,

'ए नॉर्मन डुकरा ! कुणाला भीती घालतोस रे ? माझी मुलगी अगोदर परत दे. समजलं ? एक छदाम मी देणार नाही तोपर्यंत ! थुंकतो मी तुझ्या तोंडावर.'

थक्क झालेल्या बेवूफचा चेहरा विदीर्ण झाला. बाजू अशी उलटलेली पाहून क्षणभर काय बोलावं, हेच त्याला कळेना. हात-पाय आपटत तो ओरडला,

'विचार कर थेरड्या, हालहाल करून ठार मारू आम्ही तुला. समजलं ?'

'जा रे नॉर्मन डुकरा- थू ऽ ! भितो काय मी तुला ? वाटेल तेवढा छळ करा. पण रिबेकाला सोडत नाही तोपर्यंत एक छदाम देणार नाही.'

'अस्सं ? पकडा रे या थेरड्याला आणि बांधा त्या पलंगावर. बघतो कसा शरण येत नाही तो', बेवूफ किंचाळला.

पण त्याचे शब्द पुरे होण्यापूर्वीच किल्ल्याच्या बाहेरून उंच स्वारात शिंग वाजायला लागलं. धुत्ऽऽत्ऽऽऽत्ऽऽऽत्ऽऽऽ

त्या प्रचंड आवाजानं आभाळ कोंडून गेलं. तो आवाज म्हणजे सरळ सरळ युध्दासाठी दिलेलं आव्हान होतं.

बेवूफ दचकला आणि सैनिकांना म्हणाला,

'चला रे. काहीतरी संकट कोसळलेलं दिसतंय्. या थेरड्याचा समाचार नंतर घेऊ या.'

बेवूफ घाईघाईनं बाहेर पडला.

शिंगाचा आवाज ब्रॅसी आणि गिल्बर्ट यांनीही ऐकला. तेही घाईघाईनं तटाकडं निघाले.

ब्रॅसी त्यावेळी विनंती करत होता रॉवेनाला- तिनं त्याच्याशी लग्न करावं म्हणून. पण रॉवेनानं त्याला धुडकावून लावलं,

'माझं विल्फ्रेड- म्हणजेच आयव्हॅनहोवर प्रेम आहे. लग्न करीन तर त्याच्याशीच.'

ब्रॅसी दुष्टपणे हसला. म्हणाला,

'तू मूर्ख आहेस. ज्या विल्फ्रेडबरोबर लग्न करण्याची तू इच्छा करते आहेस, तो आज माझ्या कैदेत आहे.'

भीतीनं रॉवेनाचे डोळे विस्फारले. ब्रॅसी पुढं म्हणाला,

'आणखी ऐक. तुला ज्यानं लहानाची मोठी केली, तो सेड्रिक तुझ्याबरोबरच आम्ही कैदी बनवला आहे. तू नकार तर देऊन बघ.- उद्याच मी सेड्रिकला फासावर चढवेन.'

रॉवेना मटकन् खालीच बसली. त्याचवेळी किल्ल्याबाहेर शिंग वाजायला लागल्यामुळं ब्रॅसी बाहेर पडला.

रिबेकाचा अनुभव यापेक्षा फारसा वेगळा नव्हता.

गिल्बर्टनं रिबेकाला अशीच धमकी दिली होती. तो म्हणाला,

'विचार कर. तुझे वडील आमच्या ताब्यात आहेत. तू नकार दिलास तर त्यांना हालहाल करून ठार मारू आम्ही.'

यावेळी रिबेकानं मोठंच धाडस दाखवलं. खोलीच्या उंच खिडकीत ती चढली आणि गिल्बर्टला म्हणाला,

'माझ्या वडलांना तू मारणारच आहेस. मी आता या उंच खिडकीतून उडी मारून जीव देते.'

गिल्बर्ट आऽ वासून पाहातच राहिला. एवढ्यात शिंग वाजलं. त्यामुळं तोही घाईघाईनं बाहेर पडला.

युध्दाचं आव्हान देणारं शिंग कोण वाजवत होतं ?

***

## ७. आयव्हॅनहोची सुटका

गर्थनं लॉकस्लेला अन्यायाची सगळी कहाणी सांगितलेली होतीच. शिवाय त्यांच्या मदतीला आता आला होता, काळा सरदार.

लॉकस्लेला बातमी कळली होती. सेड्रिक आणि त्याच्याबरोबरच्या सर्वांना टॉर्किलस्टोनच्या तुरुंगात ठेवलं होतं. जखमी विल्फ्रेडलाही त्याच किल्ल्यावरच्या तुरुंगात पण अत्यंत गुप्तपणे नेण्यात आलं होतं. ही बातमी काळ्या सरदाराला त्याच्या हेरांकडून कळली होती. त्यांना सोडवण्याचा एक धाडसी डाव सर्वांनी आखला.

वाम्बानं गिल्बर्टच्या नावानं एक पत्र पाठवलं. त्यात लिहिलं होतं.

'मी वाम्बा नावाचा विदूषक तुम्हाला आज्ञा करतो आहे की दोन तासात तुम्ही सर्व कैद्यांची सुटका करा. अन्यथा आमच्या भयानक हल्ल्याखाली तुमचा किल्ला उध्वस्त तर करूच, पण तुमच्यापैकी एकही जण जिवंत सुटू शकणार नाही.'

ते पत्र पाहून किल्ल्यातील अनेकांना आश्चर्य वाटलं.

वाम्बासारखा साधा विदूषक असं पत्र लिहिण्याचं धाडस करू शकतो, यावर त्यांचा विश्वासच बसेना.

ज्याअर्थी वाम्बा असं पत्र लिहू शकतो, त्याअर्थी त्याच्यामागं फार मोठी ताकद असली पाहिजे, अशीच किल्ल्यातील सरदारांची समजूत झाली.

वाम्बानं आणखी एक गंमत केली. पाद्र्याचा पोषाख घालून तो सरळ किल्ल्याकडं निघाला. आपला चेहरा दिसू नये, याची त्यानं खबरदारी घेतली होती. आपला झगा त्यानं चेहऱ्यावर ओढला होता.

वाम्बा आता अगदी पाद्ऱ्यासारखा दिसत होता. तरीही किल्ल्याच्या दारात पोचल्यावर पहारेकऱ्यांनी त्याला हटकलंच. वाम्बानं पाद्ऱ्याचा आव आणून सांगितलं,

'मी चर्चचा मनुष्य ! गिल्बर्टसाहेबांनी पकडलेले कैदी आज मारले जाणारआहेत; असं समजलं. त्यांना सुखानं मरण यावं, म्हणून शेवटची प्रार्थना म्हणण्यासाठी आलोय् मी !'

पहारेकऱ्यांना त्याचं म्हणणं ताबडतोब पटलं. वाम्बाला किल्ल्यात प्रवेश मिळाला.

सैनिकांनी वाम्बाला बेवूफपुढं उभं केलं. त्या क्रूर सरदाराला पाहून वाम्बाला घाम फुटला.

पण बेवूफ वेगळ्याच विचारात होता. त्यानं विचारलं,

'तू आत्ता खालच्या जंगलातून आलास काय ?'

'होय साहेब. काही सॅक्सन मंडळी भेटली. त्यांचे काही लोक तुमच्या कैदेत आहेत, असं कळलं. ते मरणारच आहेत बिचारे ! त्यांच्यासाठी शेवटची प्रार्थना म्हणण्यासाठी आलोय् मी !'

पाद्ऱ्याच्या प्रार्थनेचं बेवूफला कौतुक नव्हतं. त्यानं सावधपणे विचारलं,

'किती सॅक्सन गुंड आहेत खालच्या जंगलात ?'

'किमान पाचशे तरी आहेतच !'

बेवूफ दचकलाच. कारण किल्ल्यात फारशी ताकद नाही, हे त्याला पक्कं माहीत होतं.

'काय ? पाचशे ? छे ! हे सॅक्सन लोक फारच माजले आहेत.'

बेवूफनं आणखी थोडा वेळ विचार केला आणि मग तो म्हणाला,

'ठीक आहे. किल्ल्याच्या आश्रयानं आम्ही सॅक्सन लोकांना झुंजवू.-- कोण आहे रे तिकडं ?-- या पाद्ऱ्याला घेऊन जा तुरुंगात-- त्या सेड्रिकसाठी शेवटची प्रार्थना म्हणू दे याला.'

वाम्बाला आतून आनंदाच्या उकळ्या फुटल्या. आपला यशस्वी होणारा डाव बघून तो जाम खूष झाला. आता आपल्याला मालकाला सोडवण्यात यश येणार तर ! पण तो आनंद बेवूफला दिसू नये, म्हणून वाम्बानं आपला चेहरा अधिकच झाकून घेतला.

सैनिकांनी वाम्बाला सेड्रिकच्या कोठडीत नेलं. सैनिक निघून गेल्यावर वाम्बा नाटकीपणानं म्हणाला,

'ईश्वर तुझं कल्याण करो.'

सेड्रिक गुरगुरला,

'हंऽ ! कोण ? पाद्री ? तुला बेवूफनं पाठवलेलं दिसतंय् ! शेवटची प्रार्थना म्हणण्यासाठी का ? पण लक्षात ठेव, सॅक्सन मृत्यूला घाबरत नसतो.'

'अच्छा ? फाशीचा दोर दिसत नाही, तोपर्यंत प्रत्येकजण असंच म्हणतो.'

'जा रेऽ ! प्रत्येक सॅक्सन दिमाखात जगतो आणि त्याच दिमाखात मृत्यूला आलिंगन देतो.'

वाम्बाला उचंबळून आलं. तोंडावर ओढलेला झगा किंचित् मागं फेकून तो म्हणाला,

'धनी, मला ओळखलं नाहीत ?'

सेड्रिक थक्क झाला.

'वाम्बा ? तू ? पाद्र्याच्या वेषात ?'

'मग काय करणार ? तुमच्यापर्यंत पोचायचा हा एकच मार्ग होता.'

'शाब्बास !'

'धनी, तुम्ही आता हा झगा घ्या. पाद्री व्हा आणि किल्ल्याबाहेर जा ! खाली जंगलात लॉकस्ले, त्याचे सहकारी आणि काळा सरदार तुमची वाट पाहात आहेत. तुम्ही लवकर बाहेर पडा. विल्फ्रेड सुध्दा याच किल्ल्यात जखमी अवस्थेत कैदेत असावा, अशी बातमी आहे. धनी, तुम्ही बाहेर पडा आणि आम्हा सर्वांचे प्राण वाचवा !'

आता फार विचार करायला वेळच नव्हता. सेड्रिकऐवजी वाम्बा कोठडीत थांबला.

उंचीनं दोघंही सारखेच असल्यामुळं कुणाला शंका येण्याचं कारणच नव्हतं.

सेड्रिकनं पाद्र्याचा झगा अंगभर घेतला. बाहेर येऊन तो झपाट्यानं किल्ल्याच्या दरवाजाकडं निघाला. तेवढ्यात बेवूफनं त्याला गाठलं.

'काय ? सर्वांसाठी प्रार्थना म्हणून झाली. ?'

'होय !'

'आता किल्ल्याखाली चालता हो आणि जंगलात जमलेल्या सॅक्सन गुंडाना

माझा एक निरोप सांग.- या किल्ल्यावर त्यांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला, तर आम्ही सेड्रिकला प्रथम फाशी देऊ.'

सेड्रिकला हसू आलं. केवळ मान हलवून तो परत निघाला. बेवूफ लांबूनच ओरडला,

'पाद्ऱ्या, कामगिरी फत्ते कर. यशस्वी झालास, तर पोहत पोहत पिशील, इतकी दारू देईन तुला.'

'आता रक्ताच्या नद्या वाहतील', असं स्वतःशी पुटपुटून सेड्रिक वेगानं किल्ला उतरला.

वाम्बाऐवजी प्रत्यक्ष सेड्रिक परतलेला बघून जंगलातील सर्व मंडळी थरारलीच. त्यांचा डाव कल्पनेपेक्षा अधिक यशस्वी झाला होता.

पराक्रमासाठी सर्वांचे बाहू स्फुरण पावू लागले. काळ्या सरदाराच्या नेतृत्त्वाखाली सर्वांनी सैन्याच्या तुकड्या केल्या.

प्रचंड गदारोळात चढाईला प्रारंभ झाला.

बेवूफ आणि गिल्बर्ट संतापले. त्यांनी सैनिकांना सांगितलं,

'त्या सेड्रिकला फरफटत इथं आणा. या बंडखोरांसमोर सेड्रिकला फासावर चढवू या.'

सैनिकांनी सेड्रिकला म्हणून प्रत्यक्षात वाम्बालाच बाहेर आणलं. त्याला पाहून बेवूफ आऽ वासून बघायलाच लागला.

'हे काय ? हा कोण ? सेड्रिक कुठाय ?'

'सेड्रिक, माझे धनी, केव्हाच किल्ला सोडून खाली उतरले.'

'ते कसं शक्य आहे ?'

'काय अशक्य आहे ? मी जसा शांतपणे किल्ल्यावर आलो, आरामात तुरुंगात जाऊन बसलो, तसेच तेऽऽ--'

'त्याला बोलून देऊ नका. आत्ताच्या आत्ता ठार मारा त्याला.'

एका सैनिकानं सर्रकन् तलवार उपसली. एवढ्यात सूंऽसूंऽ करत एक बाण आला आणि त्याच्या छातीत घुसला.

भयानक किंकाळी फोडून तो सैनिक खाली कोसळला.

अचानक बाणांचा पाऊस पडायला लागला. किल्ल्यावरच्या वादळी आक्रमणाची ती चुणूक होती.

आक्रमकांनी तटाला शिड्या लावल्या. किल्ल्यात आत घुसण्याचा प्रयत्न सुरू झाला. किल्ल्यात एकच गोंधळ आणि पळापळ सुरूझाली.

किंकाळ्यांनी आसमंत भरून गेलं. पहिल्या धक्क्यातून बाहेर पडलेल्या गिल्बर्ट व बेवूफनं भराभर आज्ञा देण्यास सुरवात केली. किल्ल्यावरूनही मारा सुरू झाला.

पण सेड्रिक, काळा सरदार आणि लॉकस्ले यांच्या चढाईपुढं किल्ल्याचा प्रतिकार कमी पडायला लागला.

रणधुमाळी उडाली. काळा सरदार शिडीच्या सहाय्यानं किल्ल्यात घुसला. त्याच्या हातातल्या परशूखाली किल्ल्यातले सैनिक पटापट मरायला लागले.

किल्ल्याचा दरवाजा उघडण्यात त्याला यश मिळालं. सेड्रिक, लॉकस्ले आणि त्यांचे सगळे सहकारी मधमाशांच्या थव्यासारखे आत घुसले. किंकाळ्या उठल्या.

काळ्या सरदाराची भेट बेवूफशी झाली. संतापलेला काळा सरदार बेवूफवर तुटून पडला. पाचसात घावाखाली त्याचं चिलखत फुटलं, रक्ताचा लोंढा निघाला आणि बेवूफचं कलेवर खाली कोसळलं.

ब्रॅसीची तीच अवस्था झाली असती, पण शहाणपणा करून तो गुडघे टेकून शरण गेला. त्याला कैदी करण्यात आलं. किल्ल्याची दाणादाण उडाली. पण या गडबडीत घाबरलेला गिल्बर्ट मात्र पळून गेला. जातांना रिबेकालाही पळवून नेण्यास तो विसरला नाही.

सेड्रिकनं संधी मिळताच प्रथम विल्फ्रेडला शोधून काढलं. जखमी विल्फ्रेडला कोठडीच्या बाहेर काढण्यात आलं. त्याला मिठीत घेऊन त्याच्या कपाळाचं चुंबन घेत सेड्रिक म्हणाला,

'शाब्बास रे वाघा. बहाद्दर आहेस !'

***

## ८. रिचर्ड दि लायन हार्ट

किल्ला ताब्यात मिळाला. किल्ल्यात प्रचंड धन होतं. ते आता सेड्रिक, लॉकस्ले आणि काळा सरदार यांच्यात विभागलं जाणार होतं. पण तिघंही स्वभावानं असे उदार होते की पहिला वाटा घेण्यासाठी एकमेकाला आग्रह करत होते. शेवटी काळा सरदार म्हणाला,

'आपण असं करू या. रिचर्ड राजा इंग्लंडला परत येईतोपर्यंत हे धन तसंच ठेवू या.'

'पण रिचर्ड तर जर्मनीमधे तुरुंगात आहे.'

'मुळीच नाही, तो तुरुंगातून केव्हाच सुटला आहे.'

'हुर्रेऽऽऽ !' सैनिकांनी आनंदानं आरोळ्या ठोकल्या.

--- इकडं जॉन राजाच्या राजवाड्यात नेहमीप्रमाणं ऐषआराम चालला होता. एवढ्यात काळ्या सरदारानं सोडून दिलेला ब्रॅसी पाय ओढत आला. जॉन राजाला आश्चर्य वाटलं.

'ब्रॅसी, अरे काय ही तुझी अवस्था !' तो म्हणाला.

'काळ्या सरदारानं माझी अशी अवस्था केली. शिवाय त्यांनी आपला महत्त्वाचा किल्लाही जिंकलाय्.'

जॉन राजा दचकला. ब्रॅसी पुढं म्हणाला,

'आणखी एक खराब बातमी आहे.'

'कोणती ?'

'मला वाटेतच गुप्तहेराकडून समजलीय्.--- रिचर्ड कैदेतून सुटला आहे आणि

लवकरच तो इथं येणार आहे.'

जॉन राजाचा चेहरा भीतीनं पांढरा पडला. तो बोलतांना चाचरायला लागला. त्यानं वाल्देमार या सरदाराला बोलावून सांगितलं,

'हे बघ. आपला सगळ्यात खतरनाक शत्रू कैदेतून सुटल्याची बातमी आली आहे.'

'कोण ? रिचर्ड ?'

'होय ! त्याला खतम करण्याची जबाबदारी मी तुझ्यावर सोपवतो. कामगिरी फत्ते केलीस तर तुला सोन्याच्या मोहोरांची आंघोळ घालीन.'

रिचर्डला मारण्याची प्रतिज्ञा करून वाल्देमार राजवाड्यातून बाहेर पडला.---

--- गिल्बर्टनं रिबेकाला पळवून नेलं. काळ्या सरदाराच्या तडाख्यातून वाचल्याचं समाधान त्याच्या चेहऱ्यावर होतं.

पण जंग जंग पछाडूनही रिबेका त्याला वश होईना. त्यावेळी त्यानं रिबेकाला ल्युकस या प्रख्यात नॉर्मन माणसाच्या घरी आणून ठेवली. शेवटी गिल्बर्टनं रिबेका ही चेटकीण आहे, असं जाहीर केलं.

लोकांमधे ही वार्ता वाऱ्यासारखी पसरली. अगोदरच वातावरण ज्यू लोकांच्या विरुध्द होतं. साहजिकच सर्वांना ही वार्ता खरी वाटली.

त्या काळच्या नियमांप्रमाणे रिबेकावर खटला भरण्यात आला. पण कोर्टापुढं रिबेकानं अत्यंत निर्भयपणे झालेला सर्व प्रकार स्वच्छपणे सांगितला.

पण कोर्ट होतं ते गिल्बर्टच्या बाजूचं. तेव्हा तिचं म्हणणं कोण मान्य करणार ? कोर्टानं निर्णय दिला,

'रिबेका दोषी आहे, हे सिध्द झालंय्. पण तिला जीव वाचवण्याची मी एक संधी देतो. गिल्बर्टविरुध्द झुंजण्यासाठी तिनं तीन दिवसात एखादा योध्दा उभा करावा. नाहीतर तिला जाळून ठार मारण्यात येईल. जर तिच्या बाजूचा योध्दा हरला, तरीही तिचा मृत्यूदंड वाचणार नाही.'

'मला हे मंजूर आहे', ताठ मानेनं रिबेका म्हणाली.

रिबेकानं पुढं अजिबात वेळ न घालवता आयव्हॅनहोला निरोप पाठवला. त्याचं प्रेम रॉवेनावर असलं तरी रिबेकाचं आयव्हॅनहोवर होतं.

रिबेकाबद्दल त्यालाही आदर होता. म्हणून त्यानं गिल्बर्टशी झुंजण्याचं मान्य केलं.

पण सेड्रिक म्हणाला,

'बेटा तुझी तब्येत अजून बरी नाही आणि जखमही भरलेली नाही. तेव्हा तुझा हा विचार योग्य नाही.'

आयव्हॅनहो हसला. बोलला,

'अन्यायाविरुध्द झगडतांना मला मरण आलं, तरी चालेल.'

युध्दाचा दिवस ठरला. लोकांची प्रचंड गर्दी उसळली. रिबेका निर्दोष आहे, याची खात्री असलेले हजारो लोक तिच्या सुटकेसाठी प्रार्थना करत होते.

आयव्हॅनहो दौडत दौडत निघाला आणि चौथ्या दिवशी सकाळी मैदानावर उपस्थित झाला. तोपर्यंत रिबेकाला खांबाला बांधून जाळण्याची तयारीही करण्यात आली होती.

आयव्हॅनहो आलेला पाहून रिबेका आनंदानं रडायला लागली.

संतापलेला गिल्बर्ट त्याच्या अंगावर चालून गेला. यावेळी आयव्हॅनहोनं युध्द लांबवलंच नाही. आक्रमक पवित्रा घेऊन दोन फटक्यात त्यानं गिल्बर्टला लोळवलं.

त्याच्या प्रत्येक फटक्यामागं जबर ताकद होती. कवच तुटलेला गिल्बर्ट खाली कोसळला.

पुढच्याच फटक्यावर आयव्हॅनहोनं त्याचं डोकं उडवलं. जयजयकारानं आभाळ भरून गेले.

जॉन राजा भयानक चिडला. चिरक्या स्वरात त्यानं सैनिकांना आज्ञा दिली,

'पकडा त्या आयव्हॅनहोला !'

सैनिक पुढं जाणार तोच आवाज उठला,

'थांबा !'

तो आवाज काळ्या सरदाराचा होता. दौडत दौडत काळा सरदार मैदानात आला. त्याच्या मागं दोरीला बांधलेले सैनिक व वाल्देमार होता.

जॉन राजाच्या पोटात भीतीचा गोळा फिरला.

तो किंचाळला,

'या काळ्या सरदाराला इथं आत कुणी सोडलं ? आणि माझ्या सैनिकांनाऽऽ---'

पण जॉनचं वाक्य पूर्ण होण्याअगोदरच काळ्या सरदारानं मुखवटा काढून टाकला. आयव्हॅनहो त्या सरदाराकडं आश्चर्यानं पाहातच राहिला आणि अचानक

गरजला,

'रिचर्ड दि लायन हार्ट !'

हजारो प्रेक्षक उभे राहिले आणि खऱ्या राजाला त्यांनी गुडघे टेकून अभिवादन केलं. क्षणार्धात चित्र पालटलं. सैनिकांनी झडप घालून जॉनला पकडलं.

रिबेकाची अर्थातच सुटका झाली.

रिचर्डनं आयव्हॅनहोचं उदंड कौतुक केलं. रॉवेना आणि आयव्हॅनहोचं लग्न झालं. सेड्रिकनंही मनातला आकस काढून टाकला. नॉर्मन व सॅक्सन वैरही थोड्या कालावधीत संपलं. सगळेजण स्नेहानं एकत्र राहायले शिकले आणि ज्याचा शेवट गोड ते सगळंच गोड नाही का ?

***

BVBK-0402894